१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड शुक्रवार । दि. १० जुलै २०२६ । अंक ३४ । पृष्ठे १० । किंमत ५₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## मतिमंद तरुणीवर अत्याचार

**नवीन पनवेल :** मतिमंद तरुणीवर अत्याचार करून नऊ महिन्यांनंतर तिने एका मुलीला जन्म दिला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल केला. २५ जून रोजी अविवाहित गरोदर स्त्रीचा सांभाळ करण्यासाठी नातेवाईक नसल्याने पीडित महिलेचे वडील आणि बहीण यांनी पीडित महिलेला त्यांच्या नातेवाईकांकडे ठेवले होते. तिच्यावर उपचार सुरू होते. या तरुणीवर उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी यांनी तिची मानसशास्त्रज्ञाने तपासणी केली. यावेळी पीडित महिला ही •➤ पान २ वर

## भीषण अपघातात दोन ठार

**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धामणी गावाजवळ बुधवारी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. मुंबईहून पुण्याकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या टुरिस्ट परमिट कारचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कारने समोरून जाणाऱ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातात गुलाम मुस्तफा शेख (३१) व एम. डी. रहयान शेख (३३) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. •➤ पान २ वर






### वे|ध|क

## पत्नीला पतीने केली मारहाण

**नवीन पनवेल :** अन्य महिलेसोबत असलेल्या अनैतिक प्रेम संबंधामुळे पत्नीला मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी आरोपी पतीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी या सेक्टर १०, कळंबोली येथे राहत असून, त्यांच्या पतीचे एका महिलेसोबत अनैतिक संबंध आहेत. त्यामुळे त्यांचे पती त्यांना वारंवार मारहाण करून शिवीगाळ आणि दमदाटी करतात. तसेच त्यांच्या मुलांकडे दुर्लक्ष करून त्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास दिला.

## पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** सात वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी आरोपी बशौकत लष्कर याच्या विरोधात खारघर पोलिस ठाण्यात आठ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सात जुलै रोजी अल्पवयीन मुलीची आई कामावर गेली असताना आरोपीने त्यांच्या घरी जाऊन सात वर्षीय मुलगी घरात असताना त्यांच्या घराचा दरवाजा बंद केला आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## गर्भपात करण्यास भाग पाडल्याप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** महिलेला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि तिला गर्भपात करण्यास भाग पाडून शिवीगाळ आणि खोट्या केसमध्ये अडकवण्याची धमकी दिल्याप्रकरणी ओमकार वैजनाथ रोडगे, इंदू रोडगे, वैभव रोडगे आणि विद्या रोडगे (सर्व राहणार मुंबई) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ५ ते २२ जून दरम्यान ओमकार रोडगे याने पीडित महिलेसोबत प्रेमाचे नाटक करून तिला लग्नाचे आमिष दाखवले आणि शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यावेळी तिला वारंवार शिवीगाळ आणि मारहाण करून मानसिक आणि शारीरिक त्रास दिला. आरोपी ओमकार रोडगे याने मोबाईलमधील पीडित महिलेचे न्यूड फोटो समाज माध्यमांमध्ये प्रसारित करण्याची धमकी दिली आणि तिला जबरदस्तीने गर्भपात करण्यास भाग पाडले.

# शिक्षक संपावर, विद्यार्थी वाऱ्यावर!

### रायगडातील ८० टक्के शिक्षक आंदोलनात

### हजारो विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दिवस वाया

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

टीईटी परीक्षेमुळे निर्माण झालेली सेवा विषयक अस्थिरता, पदोन्नतीचा प्रश्न, संचमान्यता धोरण आणि शासनाच्या कथित दुर्लक्षाच्या निषेधार्थ राज्यभरातील शिक्षकांनी गुरुवारी (दि. ९) सामूहिक रजा आंदोलन पुकारत मुंबईत शक्तीप्रदर्शन केले. या आंदोलनाचा मोठा फटका रायगड जिल्ह्यातील शाळांना बसला. जिल्ह्यातील तब्बल ८० टक्के शिक्षक आंदोलनात सहभागी झाल्याने अनेक शाळांमधील अध्यापन विस्कळीत झाले. हजारो विद्यार्थी शिक्षकांविनाच वर्गात बसून राहिले, तर अनेक ठिकाणी शिकवणीच झाली नाही.

> “शिक्षकांच्या सेवा विषयक प्रश्नांकडे शासनाने सातत्याने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे राज्यभरातील शिक्षकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. मंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली असून, लवकरच सचिव स्तरावरील बैठकीत मागण्यांवर निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.”
> – राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद

परिणामी, विद्यार्थ्यांचा एक दिवसाचा शैक्षणिक •➤ पान २ वर




### हजारो विद्यार्थी शिक्षणाविना

रायगड जिल्ह्यातील सुमारे ५ हजार ६०० शिक्षकांपैकी चार हजारांहून अधिक शिक्षक आंदोलनात सहभागी झाल्याने अनेक शाळांतील नियमित अध्यापन ठप्प झाले. काही ठिकाणी शिक्षणसेवकांच्या माध्यमातून शाळा सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे अनेक वर्गांमध्ये अध्यापन होऊ शकले नाही. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचा एक दिवसाचा शैक्षणिक वेळ वाया गेला, तर शाळा सुरू ठेवण्यासाठी शिक्षण विभागाला मोठी कसरत करावी लागली.

## कोपर खारबंदिस्तीचा उडाला बोजवारा



- कोट्यवधींच्या कामाचा बुरखा फाटला
- अडीच ते तीन हजार हेक्टर भातशेती धोक्यात
- दोषींवर कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**। पेण । प्रतिनिधी ।**

कणे येथील सुमारे ९ कोटी रुपयांची खारबंदिस्ती योजना निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वाहून गेल्याची घटना ताजी असतानाच, आता कोपर दुतर्फा खारबंदिस्ती योजनेचाही पहिल्याच पावसात बोजवारा उडाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल ६ कोटी २५ लाख रुपये खर्चाच्या या योजनेतील बांध फुटल्याने अडीच ते तीन हजार हेक्टर भातशेती धोक्यात आली असून, सार्वजनिक निधीची उधळपट्टी आणि कामातील कथित भ्रष्टाचारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सुमारे चार किलोमीटर लांबीच्या या खारबंदिस्तीचे काम स्वामी समर्थ, पुणे या कंपनीकडे देण्यात आले होते. या कामाचे मूळ ठेकेदार तात्या माने यांनी हे काम सब-ठेकेदार संतोष वुरुडे यांच्याकडे सोपवल्याचे सांगितले जात आहे. तसेच ववन, गुलाबचंद आणि नवनाथ या स्थानिक ठेकेदारांनीही या कामात सहभाग •➤ पान २ वर

## मुख्याधिकाऱ्यांना दालनात घुसून मारहाण



- महाडमध्ये पाणीप्रश्नावरून वाद चिघळला
- भाजप नगरसेवक सूरज बामणे यांच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड नगरपालिकेचे मुख्याधिकारी धनंजय सदाशिव कोळेकर यांच्यावर त्यांच्या दालनातच कथित मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावरून झालेल्या वादानंतर मुख्याधिकाऱ्याला मारहाण, शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला असून, याप्रकरणी भाजपचे नगरसेवक सूरज बामणे, राकेश पाटील आणि अन्य एका व्यक्तीविरुद्ध महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे महाडच्या प्रशासकीय व राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्याधिकारी धनंजय कोळेकर हे महाड नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील त्यांच्या दालनात नियमित कामकाज करत असताना भाजपचे नगरसेवक सूरज बामणे, राकेश पाटील आणि त्यांच्यासोबत आणखी एक व्यक्ती तेथे आली. प्रभागातील पाणीपुरवठ्याच्या समस्येवरून दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक वाद झाला. काही वेळातच हा वाद •➤ पान २ वर

## डॉक्टरांवरील हल्ल्याचा निषेध

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात शिंदे गटाच्या शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी डॉ. वैभव साळुंखे यांना मारहाण केल्याच्या घटनेचा तीव्र निषेध अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षक संघटना आणि मार्डच्या डॉक्टरांनी केला. या घटनेदरम्यान डॉक्टरांच्या मदतीला धावून आलेल्या परिचारिकांनाही धक्काबुक्की करण्यात आल्याने डॉक्टर आणि परिचारिका यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेच्या •➤ पान २ वर

## रुग्णांच्या हिताशी तडजोड नाही!




- जिल्हा रुग्णालयातील स्थलांतराला नगराध्यक्षा अक्षया नाईक यांचा कडाडून विरोध
- जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सकांना निवेदन सादर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग, पीएमसी आणि केएमसी विभाग पेण अथवा पनवेल येथे स्थलांतरित करण्याची हालचाल सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता हे महत्त्वाचे विभाग अन्यत्र हलविण्याचा निर्णय स्वीकारला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

गुरुवारी (दि. ९) जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांची भेट घेऊन महत्त्वाचे विभाग अलिबागमधील •➤ पान २ वर

### भाई जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भेट | शेकाप महिला आघाडीचा स्तुत्य उपक्रम

## आश्रमातील वृद्धांना मायेची सावली

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अलिबाग तालुक्यातील परहूर येथील श्री समर्थ कृपा वृद्धाश्रमात शेकाप तालुका महिला आघाडीच्या वतीने आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद साधत त्यांना भेटवस्तू आणि खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्यासमवेत वाढदिवस साजरा करून आपुलकीचा आणि मायेचा स्पर्श देण्याचा प्रयत्न करण्यात आला.




भाई जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शेकापच्या विविध आघाड्यांमार्फत शालेय साहित्य वाटप, गोरगरिबांना छत्री वाटप, गरजूंना मदतीचा हात अशा अनेक समाजोपयोगी उपक्रमांद्वारे वाढदिवस साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून अलिबाग तालुका शेकाप महिला आघाडीने परहूर येथील श्री समर्थ कृपा वृद्धाश्रमाची निवड करून तेथील ज्येष्ठ नागरिकांसोबत हा उपक्रम राबविला.

यावेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत केक कापून जयंत पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. उपस्थित महिलांनी वृद्धांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांची विचारपूस केली. भेटवस्तू आणि खाऊचे वाटप करून त्यांना सन्मानाची वागणूक देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेशही दिला.

या कार्यक्रमास शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, अलिबाग पंचायत समिती सदस्य अंजली ठाकूर, शेकाप महिला आघाडीच्या अनिता पवार, अनिता काकडे, भैरवी जाधव, स्नेहल पाटील, तन्वी पाटील, मनीषा रेलकर, श्री समर्थ कृपा वृद्धाश्रमाचे संचालक ॲड. जयेंद्र गुंजाळ तसेच वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

### खंडाळे अतिक्रमण प्रकरण तापले

## उपसरपंचांसह दोन सदस्य अडचणीत

- आशिष बाणेंकडून अपात्रतेची मागणी
- ग्रामपंचायत व पंचायत समितीचे अहवाल सक्षम प्राधिकरणाकडे सादर

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे येथील उपसरपंच प्रभाकर नारायण तुणतुणे तसेच सदस्य स्वाती संतोष चिंचकर आणि सुशील नंदकुमार वेळे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या विवाद अर्जातील सुनावणी निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. या प्रकरणात ग्रामपंचायत खंडाळे आणि पंचायत समिती, अलिबाग यांनी मागविण्यात आलेले अधिकृत अहवाल सक्षम प्राधिकरणाकडे सादर केले असून, या प्रकरणाची सुनावणी १० जुलै रोजी निश्चित करण्यात आली आहे.

संबंधित लोकप्रतिनिधींनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याचा आरोप •➤ पान २ वर

# अतिवृष्टीचा रायगडला फटका

## ।। ११ जणांचा मृत्यू, ३३ पशुधनहानी ।। ८८८ घरांचे नुकसान, हजारो कुटुंब बाधित

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जून महिन्याच्या अखेरीस सक्रिय झालेल्या मान्सूनने जुलैच्या पहिल्याच आठवड्यात रायगड जिल्ह्यात अक्षरशः धुमाकूळ घातला. गेल्या सहा दिवसांत जिल्ह्यात सरासरी एक हजार मिलीमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली असून, या मुसळधार पावसामुळे आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३३ पशुधनांची हानी झाली आहे. हजारो घरांमध्ये पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून, ८८८ घरांची पडझड झाल्याने लाखो रुपयांची हानी झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.



जूनच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित असलेला पाऊस तब्बल पंधरा दिवस उशिराने दाखल झाला. २० जूननंतर जिल्ह्यात पावसाने जोर धरला आणि त्यानंतर संततधार सुरूच राहिली. तळी, ओढे आणि शेतीक्षेत्र पाण्याखाली गेले. धरण क्षेत्रातही चांगला पाऊस झाल्याने लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील प्रकल्पांमधील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. जिल्ह्यातील २८ प्रकल्पांमध्ये ८४ टक्के जलसाठा झाला असून, त्यापैकी १९ धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. हेटवणे मध्यम प्रकल्पात ७१.८० टक्के पाणीसाठा झाला आहे.

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील २८० गावांतील ४ हजार ९१३ घरांमध्ये पाणी शिरले. ५५ ठिकाणी डोंगरावरील माती व दगड कोसळले, तर ७३ घरांजवळ दरडी कोसळल्याने तिघेजण जखमी झाले. याशिवाय जिल्ह्यातील पूल आणि रस्त्यांसह एकूण ४२ ठिकाणी नुकसान झाले आहे. अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्यामुळे ११ जणांचा मृत्यू झाला असून, महाड तालुक्यातील कुसगाव येथील एक व्यक्ती अद्याप बेपत्ता आहे. मानवी जीवितहानीबरोबरच पशुधनालाही मोठा फटका बसला आहे. बैल, गाय, म्हैस आणि डुक्कर अशा एकूण ३३ जनावरांचा मृत्यू झाला आहे. पावसामुळे ८८८ घरांचे नुकसान झाले असून, त्यापैकी ५१ घरे पूर्णपणे कोसळली आहेत.

### नुकसानीवर दृष्टीक्षेप

| नुकसानीचा प्रकार | संख्या |
|---|---|
| घरांची पडझड | ८८८ |
| सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान | २९ |
| खासगी मालमत्तेचे नुकसान | २०३ |
| रस्ते व पुलांचे नुकसान | ४२ |
| माती व दरडी कोसळण्याच्या घटना | ५५ |

### पोलादपूर, पेण तालुक्यांत सर्वाधिक दरडी

जिल्ह्यातील ५५ ठिकाणी दरड व माती कोसळण्याच्या घटना घडल्या. त्यामध्ये अलिबाग तालुक्यात ४, पेणमध्ये ११, कर्जतमध्ये ४, खालापूरमध्ये ६, रोहामध्ये ४, पाली आणि माणगावमध्ये प्रत्येकी २, महाडमध्ये ८, पोलादपूरमध्ये १३ आणि तळा तालुक्यात १ ठिकाणी दरडी कोसळल्या. आकडेवारीनुसार सर्वाधिक दरडी पोलादपूर आणि पेण तालुक्यात कोसळल्या आहेत.

### पोल्ट्री व्यवसायालाही मोठा फटका

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा परिणाम पोल्ट्री व्यवसायावरही झाला आहे. १४ पोल्ट्री शेडमध्ये पाणी शिरल्याने सुमारे ४ हजार २३६ कोंबड्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे पोल्ट्री व्यावसायिकांनाही मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

# रसायनी पोलीस ठाण्यात शिरले पुराचे पाणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडत रौद्र रूप धारण केल्याने परिसरातील जनजीवन विस्कळित झाले आहे. नदीच्या वाढत्या पाण्याचा फटका आता रसायनी पोलीस ठाण्यालाही बसला असून, बुधवारी दुपारपासून पुराचे पाणी थेट पोलीस ठाण्यात शिरले. त्यामुळे कार्यालयातील फर्निचर भिजले असून, महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी पोलिसांची धावपळ सुरू आहे.



गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदी दुथडी भरून वाहात आहे. सलग तीन दिवस नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नदीकाठच्या भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदीपासून अवघ्या ३०० ते ४०० मीटर अंतरावर असलेल्या रसायनी पोलीस ठाण्यातही पुराचे पाणी घुसल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

पुराच्या पाण्यामुळे पोलीस ठाण्यातील फर्निचरचे नुकसान झाले असून, काही महत्त्वाची कागदपत्रेही भिजण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, पोलीस कर्मचारी तातडीने साहित्य सुरक्षित स्थळी हलविण्यासह आवश्यक ती खबरदारी घेत आहेत.

पूरस्थितीमुळे एका बाजूला पोलीस ठाण्यातील कामकाजावर परिणाम होत असला, तरी दुसऱ्या बाजूला रसायनी पोलिसांनी आपली आपत्कालीन जबाबदारीही समर्थपणे सांभाळली आहे. गेल्या चार दिवसांत पूरग्रस्त भागात अनेक नागरिकांचे जीव वाचविण्यात पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

दरम्यान, पाताळगंगा नदी दुथडी भरून वाहत असल्याने नागरिकांनी नदीकाठच्या परिसरात जाऊ नये, तसेच प्रशासन आणि पोलिसांच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन रसायनी पोलिसांकडून करण्यात आले आहे. दरम्यान, पाताळगंगा नदीच्या रौद्रावताचा फटका पोलिसांनाही बसल्याने काही काळासाठी त्यांचीही तारांबळ उडाल्याचे चित्र दिसून आले.

# रायगडची पोलिओमुक्तीकडे वाटचाल

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम जिल्ह्यात उत्स्फूर्तपणे राबविण्यात आली. या अंतर्गत रविवार (दि.२८) रोजी जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण १ लाख ४३ हजार ९२४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. कोणताही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी २९ जून ते ३ जुलैदरम्यान आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन २३ हजार २२७ बालकांना पोलिओ लस दिली. स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरण करण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यात १०४ टक्के लसीकरण झाले असल्याने पोलिओमुक्तीकडे जिल्ह्याची वाटचाल सुरू आहे.

## जिल्ह्यात १०४ टक्के लसीकरण



० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला जवळच्या पल्स पोलिओ बूथवर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत आणि पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार पालकांनीही लसीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत १ लाख ४३ हजार ९२४ बालकांना २८ जून रोजी लस देण्यात आली. यासाठी जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. त्यानंतर घरभेटीतून आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगावाडी सेविका यांनी २३ हजार २२७ वंचित बालकांना पोलिओ लस दिली. यासाठी आरोग्य विभागातर्फे पथके तयार करण्यात आली होती. यामध्ये ग्रामीण भागासाठी ५ हजार २३० पथके तर शहरी भागासाठी ५४० पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी २९ जून ते ३ जुलैदरम्यान स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये घरभेटी देउन वंचित राहिलेल्या बालकांना पोलिओ लस दिली. त्यामळे जिल्ह्यात एकूण १०४ टक्के बालकांना लसीकरण करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. दामोदर मोरे यांच्या मार्गदर्शनखाली आरोग्य विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांनी पोलिओमुक्त रायगडसाठी मेहनत घेतली.

### नवी मुंबई विमानतळावर प्रथमच बूथ

पोलिओ लसीकरणाच्या दिवशी म्हणजेच २८ जून रोजी यावर्षी प्रथमच नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ येथे एक पोलिओ लसीकरण बूथ उभारण्यात आला होता. यावेळी एकूण २५ बालकांना पोलिओ लस देण्यात आली.

# एचपीसीएल गॅस प्लांटला पुराचा दणका

## हजारो सिलिंडर पाण्यात गेले वाहून

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील जांभीवली धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग झाल्याने सवणे हद्दीतील एचपीसीएल (हिंदुस्तान पेट्रोलियम) गॅस प्लांटमध्ये पूर शिरला. पुराच्या प्रचंड प्रवाहात प्लांटमधील मोठ्या प्रमाणातील घरगुती गॅस सिलिंडर वाहून गेल्याची घटना घडली असून, नदीपात्रातून सिलिंडर वाहात येत असल्याचे पाहून अनेक स्थानिकांनी ते बाहेर काढून घरी नेल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, परिसरात चिंतेचे वातावरण आहे.

या घटनेबाबत एचपीसीएलचे अधिकारी कुंदन कुमार यांच्याशी संपर्क साधला असता, पुराच्या पाण्यामुळे काही सिलिंडर वाहून गेल्याची त्यांनी पुष्टी केली. मात्र, किती सिलिंडर वाहून गेले, त्यापैकी किती भरलेले आणि किती रिकामे होते, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, सामाजिक माध्यमांवर व्हायरल झालेल्या चित्रफिती आणि स्थानिकांच्या माहितीनुसार, किमान तीन ते साडेतीन हजार सिलिंडर वाहून गेल्याची चर्चा आहे. मात्र, या संख्येला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

> पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे मोठ्या प्रमाणात घरगुती गॅस सिलिंडर पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. परिसरात कोणालाही असे सिलिंडर आढळल्यास त्यांची स्वतःहून हाताळणी करू नये किंवा ते स्वतःजवळ ठेवू नयेत. अशा सिलिंडरची तातडीने पोलिसांना माहिती देऊन ते पोलिसांच्या ताब्यात द्यावेत.- अभिजित भुजबळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रसायनी

पुराच्या पाण्यात वाहून गेलेले सिलेंडर नागरिकांनी घरी नेल्याची बाब अधिक चिंताजनक मानली जात आहे. हे सिलिंडर गॅसने भरलेले असण्याची किंवा त्यातून गॅसगळती होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने निवासी भागात मोठी दुर्घटना घडण्याचा धोका व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे औद्योगिक सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, संबंधित कंपनीच्या सुरक्षाव्यवस्थेची चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



# सोन्याची चेन खेचून तिघे पसार

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि सोन्याचे लॉकेट खेचून तिघेजण पसार झाल्याची घटना पनवेल शहरातील आंबेडकर पुतळ्याजवळ घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात सात जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

येथील महिला ही सात जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास आंबेडकर पुतळ्याजवळून रस्त्याने पायी चालत जात असताना रेनकोट घालून आलेल्या तिघा आरोपींनी महिलेच्या गळ्यातील तीन तोळे वजनाचे सोन्याची चैन आणि सोन्याचे लॉकेट खेचून ते धावत पळून गेले. या प्रकाराची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबतचा अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत. दरम्यान, वाढत्या सोनसाखळी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. चोरट्यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

पान १ वरुन

## शिक्षक संपावर, विद्यार्थी वाऱ्यावर!

वेळ वाया गेला असून, पर्यायी व्यवस्था उभी करताना जिल्हा परिषद शिक्षण विभागाची चांगलीच तारांबळ उडाली.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली हे राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना, शिक्षक संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, टीईटी उत्तीर्ण शिक्षक कृती समिती, महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा शिक्षक संघटना, शैक्षणिक व्यासपीठ, मुख्याध्यापक संघटना तसेच अन्य समविचारी शिक्षक संघटनांनी या आंदोलनात सहभाग घेतला. रायगड, ठाणे, पालघर, नवी मुंबई, मुंबई आणि महानगरपालिका क्षेत्रातील सहा हजारांहून अधिक शिक्षक आंदोलनात सहभागी झाले.

आंदोलनकर्त्या शिक्षकांनी पदोन्नती प्रक्रियेला तातडीने स्थगिती देणे, पुणे येथील शिक्षण संचालकांनी सुरू केलेली विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया रद्द करणे, वादग्रस्त पत्र मागे घेणे तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये त्या पत्राच्या आधारे पदोन्नती झाली आहे ती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली. सन २०१३ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या सेवाज्येष्ठ शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्णतेच्या नियमात शिथिलता देण्याचीही मागणी करण्यात आली. तामिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक, केरळ आणि तेलंगणा राज्यांच्या धर्तीवर सेवाज्येष्ठ शिक्षकांसाठी उत्तीर्णतेची अट ४० टक्के गुणांपर्यंत शिथिल करावी, तसेच ते शिकवत असलेल्या इयत्तांच्या अभ्यासक्रमावर आधारित समकक्ष पात्रता परीक्षा आयोजित करावी, अशी मागणी शिक्षकांनी केली.सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीसाठी पात्रता धारण करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत मुदत दिली असल्याने, त्या निर्णयाच्या अधीन राहून आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेल्या सेवाज्येष्ठ शिक्षकांना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर पदोन्नतीची संधी द्यावी, अशी मागणीही करण्यात आली.विद्यार्थी व शाळाविरोधी असल्याचा आरोप करत संचमान्यता धोरण तातडीने रद्द करावे, तसेच बीएलओसह सर्व प्रकारच्या अशैक्षणिक कामांतून प्राथमिक शिक्षकांची मुक्तता करावी, जेणेकरून शिक्षक पूर्णवेळ अध्यापनासाठी उपलब्ध राहतील, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मुंबईतील आंदोलनानंतर शिक्षणमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली असून, लवकरच सचिव स्तरावरही बैठक होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी दिली.

## मुख्याधिकाऱ्यांना मारहाण

चिघळला आणि त्याचे रूपांतर कथित मारहाणीत झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.मुख्याधिकारी कोळेकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांना मारहाण करण्यात आली, शिवीगाळ करण्यात आली तसेच जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. या घटनेत ते जखमी झाले असून, त्यांच्यावर महाड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यात आले.घटनेनंतर मुख्याधिकारी कोळेकर यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी भाजप नगरसेवक सुरज बामणे, राकेश पाटील आणि अन्य एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते करीत आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यावर त्याच्याच दालनात झालेल्या या कथित हल्ल्यामुळे महाड शहरात एकच खळबळ उडाली असून, या घटनेची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

## कोपर खारबंदिस्तीचा उडाला बोजवारा

घेतल्याची माहिती पुढे आली आहे.स्थानिकांच्या आरोपानुसार, मंजूर आराखड्यानुसार खारबंदिस्तीचा पाया १२ मीटर रुंद, ४ मीटर उंच, वरचा माथा ३ मीटर, एक फूट मुरूम व नियमानुसार उघाड्या ठेवणे आवश्यक होते. मात्र, प्रत्यक्षात अंदाजपत्रकातील निकषांना हरताळ फासून काम करण्यात आले. विशेषतः जोहे हद्दीलगतच्या भागात उघाड्यांची रुंदी कमी ठेवून अधिकाऱ्यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या निष्काळजीपणाचा फटका आता थेट शेतकऱ्यांना बसला आहे. खारबंदिस्ती फुटल्याने समुद्राचे खारे पाणी शेतीत शिरण्याचा धोका निर्माण झाला असून, अडीच ते तीन हजार हेक्टर भातशेती संकटात सापडली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.याप्रकरणी संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करून संपूर्ण काम नव्याने आणि दर्जेदार पद्धतीने करण्यात यावे, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा जोहे गावचे माजी सरपंच काशिनाथ पाटील यांनी केली आहे. अन्यथा खारभूमी अभिलेख कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.एकामागून एक कोट्यवधी रुपयांच्या खारबंदिस्ती योजना पहिल्याच पावसात वाहून जात असताना, या कामांवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी नेमकी काय, असा संतप्त सवाल आता शेतकरी आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दोषींना पाठीशी न घालता त्यांच्यावर कठोर कारवाई करून सार्वजनिक पैशांची उधळपट्टी रोखावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## डॉक्टरांवरील हल्ल्याचा निषेध

निषेधार्थ डॉक्टरांनी काळ्या फिती लावून नियमित आरोग्य सेवा सुरू ठेवत निषेध नोंदविला. डॉक्टर, परिचारिका आणि संपूर्ण आरोग्य यंत्रणा रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी चोवीस तास सेवा बजावत असते. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांवर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटना सातत्याने वाढत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा घटना रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची जबाबदारी शासनाची असताना, त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना डॉक्टरांनी व्यक्त केली.

कल्याण-डोंबिवली येथील घटनेप्रकरणी आरोपी रमेश म्हात्रे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांनी काळ्या फिती लावून कामकाज सुरू ठेवले. तसेच महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन सादर करून दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

**कल्याण-डोंबिवली येथे डॉक्टर आणि परिचारिकांवर झालेल्या हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथील सर्व डॉक्टर काळ्या फिती लावून आरोग्य सेवा बजावत आहेत. डॉक्टरांवर हात उगारणाऱ्यांवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, हीच आमची ठाम मागणी आहे. - डॉ. करण वाघमारे, जनरल सेक्रेटरी, डॉक्टर शिक्षक संघटना**

## मतिमंद तरुणीवर अत्याचार

मतिमंद दिसून आली. या पीडित महिलेवर ती राहात असलेल्या ठिकाणी अज्ञात व्यक्तीने लैंगिक अत्याचार केला. यात ती गर्भवती राहिली. नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर जून महिन्यात तिची प्रसूती झाली आणि तिने एका मुलीला जन्म दिला. अज्ञात व्यक्तीने २०२५ मध्ये तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## भीषण अपघातात दोन ठार

दोघेही मूळचे पश्चिम बंगाल येथील रहिवासी असून, सध्या बेहनाम नगर, बांद्रा (मुंबई) येथे वास्तव्यास होते. कारमधील आणखी एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर नवी मुंबईतील कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चौथ्या प्रवाशाला किरकोळ दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे.अपघाताची माहिती मिळताच खालापूर पोलीस, महामार्ग पोलीस आणि मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तत्काळ रुग्णालयात हलविण्यात आले, तर मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले.सतत सुरू असलेल्या पावसामुळे रस्ता ओला असल्याने तसेच कारचे ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

## रुग्णांच्या हिताशी तडजोड नाही!

जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सुरक्षित आणि सुस्थितीत असलेल्या इमारतीतच तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्याची मागणी त्यांनी केली. अन्यथा लोकशाही मार्गाने जनआंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील अस्वच्छता, अपुऱ्या सुविधा आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत गेल्या दोन दिवसांपासून नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी थेट रुग्णालय प्रशासनाची झाडाझडती सुरू केली आहे. रुग्णालयाच्या कारभाराबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत पंधरा दिवसांत सुधारणा न झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिला होता. त्याच दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागासह काही महत्त्वाचे विभाग पेण आणि पनवेल येथे हलविण्याची चर्चा सुरू झाल्याने त्यांनी या विषयातही पुढाकार घेतला. जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्याशी झालेल्या चर्चेत त्यांनी स्पष्ट केले की, रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विभाग तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करणे आवश्यक असल्यास त्यास विरोध नाही. मात्र, हे विभाग पेण किंवा पनवेल येथे हलविण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मान्य केला जाणार नाही. याबाबतचे निवेदनही त्यांनी संबंधित प्रशासनाकडे सादर केले.

अक्षया नाईक यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असून, पनवेलपासून पोलादपूरपर्यंत हजारो रुग्ण उपचारासाठी येथे येतात. अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, रोहा, कर्जत, माणगाव, खालापूर तसेच किनारपट्टी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे प्रमुख शासकीय आरोग्य केंद्र आहे. रुग्णालयाच्या आंतररुग्ण इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील शस्त्रक्रिया विभाग, पीएमसी आणि केएमसी वॉर्ड धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने निदर्शनास आणून दिले आहे. अशा परिस्थितीत हे विभाग पेण किंवा पनवेल येथे स्थलांतरित केल्यास गरीब, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि गंभीर रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होईल. त्यांना अतिरिक्त प्रवास, आर्थिक भार आणि उपचारासाठी होणारा विलंब सहन करावा लागेल. त्यामुळे पीएमसी, केएमसी आणि शस्त्रक्रिया विभाग कोणत्याही परिस्थितीत अलिबागबाहेर न हलविता जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या परिसरातील सुरक्षित आणि सुस्थितीत असलेल्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात सुरू ठेवण्यात यावेत, अशी ठाम मागणी त्यांनी केली. यावेळी नगरसेविका ॲड. अश्विनी ठोसर, ॲड. ऋषीकेश माळी आदी उपस्थित होते.

## उपसरपंचांसह दोन सदस्य अडचणीत

अर्जामध्ये करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांना ग्रामपंचायत सदस्यपदासाठी अपात्र ठरविण्याची मागणी करण्यात आली असून, त्याबाबतची कायदेशीर प्रक्रिया सध्या सुरू आहे. तथापि, या आरोपांवर अद्याप अंतिम निर्णय झालेला नसून, प्रकरण सक्षम प्राधिकरणाकडे विचाराधीन आहे. या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा ॲड. आशिष अशोक बाणे यांनी पाठपुरावा केला आहे. त्यांनी शासकीय अभिलेख, महसूल विभागाची कागदपत्रे आणि संबंधित नोंदींच्या आधारे विवाद अर्ज दाखल केला होता. त्यानंतर सक्षम प्राधिकरणाने ग्रामपंचायत आणि पंचायत समितीकडून अहवाल मागविले होते. हे दोन्ही अहवाल आता सादर झाल्याने प्रकरणाच्या सुनावणीला वेग आला आहे. यावेळी ॲड. आशिष बाणे म्हणाले की, ही लढाई कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कायद्याचे राज्य, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व टिकवून ठेवण्यासाठी आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी कायद्याचे पालन करणे अपेक्षित आहे. सक्षम प्राधिकरणासमोर सर्व वस्तुस्थिती आणि कागदपत्रे मांडण्यात आली असून, कायद्याच्या चौकटीत न्याय्य निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.

खंडाळे ग्रामपंचायतीतील हे प्रकरण आता केवळ स्थानिक पातळीपुरते मर्यादित राहिले नसून, ग्रामपंचायत कायद्यांतर्गत लोकप्रतिनिधींच्या पात्रता-अपात्रतेच्या निकषांवरही या प्रकरणाकडे पाहिले जात आहे. त्यामुळे १० जुलै रोजी होणाऱ्या सुनावणीकडे स्थानिक नागरिकांसह राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे.

**काय आहे प्रकरण?**

खंडाळे ग्रामपंचायतीमधील संबंधित लोकप्रतिनिधींनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन घरे बांधली आहेत. निवडणुकीआधी लिहून दिलेल्या प्रतिज्ञापत्रात आपण कोणत्याही सरकारी जागेवर अतिक्रमण केले नसल्याचे लिहून दिले आहे. परंतु, संबंधित लोकप्रतिनिधींनी शासनाची फसवणूक करुन शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आणून देत त्यांना अपात्र ठरविण्याची मागणी केल्याचे ॲड. आशिष बाणे यांनी सांगितले.


### जाहीर सूचना

सर्व लोकांस कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या सार्वजनिक मालकीच्या जिरायत मिळकती त्या मिळकतींच्या सातबारा सदरी विद्यमान पंच म्हणून नावे दाखल असलेल्या व्यक्ती आमचे अशिलांची संमती नसताना अनाधिकाराने विकणार असल्याची तथापी त्यांच्याकडून विक्रीसंबंधी बोलणी/वाटाघाटी चालू असल्याची माहिती १. श्री. मयूर भास्कर घरत २. श्री. जयवंत जानू घरत व ३. श्री. सुनिल गोविंद घरत वैगरे सर्व राहणार मु. पालव, पो. चौल, ता.अलिबाग, जि.रायगड, पिन- ४०२२०३ या आमचे अशिलांस प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबाग यांच्या स्थळसीमेतील ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा,
मौजे पालव येथील खालील वर्णनाच्या जिरायत मिळकती.

| मौजे | गट नं. / हिस्सा नं. | एकूण क्षेत्र (हे.आर) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| पालव | ३४ जुना (सर्व्हे नं. २२१) | १.७३.८० | ०.४४ |
| पालव | ३५ जुना (सर्व्हे नं. २२२) | २.०९.०० | १.७५ |
| पालव | ३७ जुना (सर्व्हे नं. २२४) | ३.१२.०० | ३.२५ |

वरील वर्णनाच्या सार्वजनिक मालकीच्या सर्व जिरायत मिळकती आमचे अशिलांच्या ताबे, कब्जा वहिवाटीच्या व सामाईक मालकी हक्काच्या आहेत. सदर मिळकतींच्या विक्रीस आमचे अशिलांची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. आमचे अशिलांची या मिळकतींच्या विक्रीस सक्त हरकत आहे. तरीही पंचांकडे असलेल्या स्वाक्षरीच्या अधिकारांचा गैरवापर करून अधिकाराने सदर मिळकतीची विक्री तसेच त्यांच्या सातबारा सदरी पंच म्हणून असलेल्या नावांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न सुरु असल्याची माहिती आमचे अशिलांस प्राप्त झालेली आहे. तरीही सदर विक्रीस व त्यांच्या सातबारा सदरी पंच म्हणून असलेल्या नावांमध्ये करण्यात येणाऱ्या बदलास आमचे अशिलांची सक्त हरकत असून वरील कोणत्याही प्रकारे होणारी विक्री व नावांमधील बदल तसेच आमचे अशिलांचे परवानगीशिवाय केलेले सर्व विक्री व्यवहार हक्कनोंद/अधिकार अभिलेखातील बदल आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद सर्वांनी घ्यावी.

नागाव, अलिबाग
दिनांक : ०८/०७/२०२६

सही /-
**ॲड. नम्रता सुभाष नाईक**
ऑफिस पत्ता: मु.पो.नागाव ऑफिस,
गाळा क्र.०२. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ,
श्रीराम मंदिरासमोर, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन ४०२२०४

## निवडक



### ॲड. गौतम पाटील यांचा सत्कार

**अलिबाग :** रायगड जिल्हा ग्रंथालय संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा अलिबाग येथील सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. जिल्ह्यातील विविध सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, संचालक आणि ग्रंथपाल यांच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या या सभेत ग्रंथालय चळवळीला बळ देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सभेच्या प्रारंभी सामाजिक, शैक्षणिक, कायदेविषयक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ॲड. डॉ. गौतम पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. नुकत्याच थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या ३६ व्या वर्ल्ड स्कूल समिट मध्ये त्यांना ''आऊटस्टँडिंग एज्युकेशन ॲडमिनिस्टेटर'' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. तसेच, त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील बहुआयामी योगदानाची दखल घेत मेरीलँड स्टेट युनिव्हर्सिटी, यू.एस.ए. यांनी त्यांना ''डॉक्टर ऑफ फिलॉसॉपी इन एज्युकेशन'' ही मानद पदवी बहाल केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे यांच्या हस्ते ॲड. डॉ. गौतम पाटील यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी संघाच्या उपाध्यक्षा शैलाताई पाटील, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, ज्येष्ठ संचालक संजय खांबेटे, दयानंद भगत, रजिता माळवी, जिल्हा ग्रंथालय कार्यालयातील अधिकारी ममता रोगे तसेच सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेचे माजी उपाध्यक्ष आणि पनवेलचे माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून मंगळवारी (दि.७) कामोठे येथील डीएसपी इंटरनॅशनल स्कूलमध्ये त्यांच्या स्मारक पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण शेठ घरात, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, नगरसेवक प्रकाश म्हात्रे, नगरसेवक व गटनेते केतन भगत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, एम. ए. डीपी. शिक्षण संस्थेचे सीईओ रा.गो. पाटील, माजी नगरसेवक शंकर शेठ मात्रे, प्रमोद भगत व शाळेचे शिक्षक गण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय दत्तूशेठ पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

# साळाव पूल संकटात

- २० टनावरील अवजड वाहतुकीस बंदी
- जिल्हादंडाधिकारी जावळे यांचे आदेश



**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा-साळाव पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलावरून २० टनांवरील अवजड वाहतुकीस पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतची अधिसूचना जारी केली असून, ही वाहतूक बंदी अधिसूचनेच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत लागू राहणार आहे. मात्र, गेले अनेक वर्षे या पुलाची सुरक्षितता धोक्यात असूनही या पुलावरून अवजड वाहतूक सुरू असताना संबंधित यंत्रणा नेमक्या काय करत होत्या, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

रेवदंडा-साळाव पूल अवजड वाहतुकीसाठी धोकादायक स्थितीत असल्याने पुलाच्या संरचनात्मक बळकटीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. यापूर्वी पुलावरून १२ टनांवरील अवजड वाहतुकीस बंदी घालण्यात आली होती. सद्यस्थितीत संबंधित कंत्राटदारामार्फत पुलाच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात असून, पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने २० टनांवरील जड व अवजड वाहतूक बंद ठेवण्याची आवश्यकता असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे. संबंधित कंत्राटदाराने पुलावरून वाहतुकीसाठी काही महत्त्वपूर्ण अटी व निर्बंध सुचविले आहेत. त्यानुसार पुलावर वाहनांची कमाल वेगमर्यादा ताशी ३० किलोमीटर ठेवणे, कोणत्याही परिस्थितीत वाहतूक कोंडी होऊ न देणे तसेच दोन वाहनांमध्ये किमान २० मीटरचे अंतर ठेवणे आवश्यक आहे. पुलावरून होणाऱ्या अति अवजड वाहतुकीमुळे पुलास क्षती पोहोचून संभाव्य दुर्घटना घडू नये, तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेची सुरक्षितता अबाधित राहावी, या उद्देशाने जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी २० टनांवरील अवजड वाहनांसाठी वाहतूक बंदीचे आदेश जारी केले आहेत. तसेच, ही वाहतूक बंदी दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाच्या संरचनात्मक स्थितीबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर प्रशासनाला जाग आल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. या आधी या मार्गावरून पुलाच्या क्षमतेपेक्षा अधिक वजनाची वाहने अनेकदा जात असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून सातत्याने केल्या जात होत्या. त्यावेळी कठोर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी असूनही प्रभावी नियंत्रण का ठेवले गेले नाही? याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

#### अवजड वाहनांसाठी पर्यायी मार्ग

अलिबाग-मुरूड मार्गावरून ये-जा कारणाऱ्या अवजड वाहनांना पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात आला आहे. अलिबागवरून मुरूड ये-जा करण्यासाठी वडखळ-नागोठणे मार्गे तळेखार-साळाव या मार्गाचा वापर करावा. याशिवाय अलिबागवरून बेलकडे-रोहा मार्गे तळेखार-साळाव हा मार्गही वाहतुकीसाठी उपलब्ध राहणार आहेत. रेवदंडा-साळाव पुलाची सुरक्षितता, संभाव्य दुर्घटना टाळणे आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने वाहनचालक व वाहतूकदारांनी प्रशासनाने या निश्चित केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा. तसेच, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

#### दुर्घटनेनंतर जागी होणारी यंत्रणा

साळाव पुलावरून २० टनांवरील अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घातल्यानंतर संपूर्ण अलिबाग-मुरूड परिसरात एकच चर्चा रंगली आहे. साळाव पूल हा केवळ काँक्रीटचा पूल नाही, तर हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा आधार आहे. त्यामुळे केवळ आदेश काढून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. नियमांची कठोर अंमलबजावणी, पारदर्शक देखरेख आणि निष्काळजीपणा करणाऱ्यांवर ठोस कारवाई झाली तरच जनतेचा प्रशासनावरील विश्वास कायम राहील, अन्यथा ''दुर्घटना झाल्यावर जागी होणारी यंत्रणा'' अशीच प्रशासनाची प्रतिमा जनमानसात अधिक गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## वडखळ ग्रामपंचायतीची दमदार कामगिरी

**। पेण । प्रतिनिधी ।**



मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजनेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर वडखळ ग्रामपंचायतीने पेण तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे वडखळ ग्रामपंचायत आता रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत पेण तालुक्याचे प्रतिनिधित्व करत आहे. जिल्हास्तरीय परीक्षणामध्ये ग्रामपंचायतीच्या विकासकामांना आणि प्रभावी नियोजनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने वडखळ ग्रामपंचायतीला जिल्ह्यातही प्रथम क्रमांक मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजनेअंतर्गत स्वच्छता, पाणीपुरवठा, ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, डिजिटल सेवा, लोकसहभाग आणि शाश्वत विकास अशा विविध निकषांवर ग्रामपंचायतींचे मूल्यमापन केले जाते. या सर्व निकषांमध्ये वडखळ ग्राम पंचायतीने प्रभावी नियोजन, दर्जेदार अंमलबजावणी आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाच्या बळावर उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्यात अव्वल स्थान मिळवले आहे. वडखळ ग्राम पंचायतीची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे गडथ फाऊंडशेनच्या सहकार्याने उभारलेला आधुनिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प. रायगड जिल्ह्यात अशा स्वरूपाचा प्रकल्प राबविणारी वडखळ ही एकमेव ग्रामपंचायत असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकल्पामध्ये ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करून त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण केले जाते. त्यामुळे हा उपक्रम जिल्हास्तरीय परीक्षणात विशेष आकर्षणाचा विषय ठरला. या यशामागे ग्राम पंचायत सरपंच शिवानी म्हात्रे, उपसरपंच योगिता मोकल, ग्रामपंचायत ग्रामअधिकारी श्रीहरी खरात, पदाधिकारी, ग्रामसेवक, कर्मचारी, विविध समित्या, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत.

## वाकण-पाली मार्ग अद्याप बंद



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्याती सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सलग तिसऱ्या दिवशी वाकण जवळील मार्गावर पूरपरिस्थिती निर्माण झाली. रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने, तसेच अंबा नदी पुलाच्या दोन्ही बाजूंच्या जोड रस्त्यावर पाणी आल्याने दोन्हीकडची वाहतूक बंद करण्यात आली. परिणामी, वाकण-पाली मार्ग वाहतुकीसाठी पुन्हा एकदा पूर्णपणे ठप्प झाला आहे.

पावसाचा जोर कायम असल्यामुळे भेरव येथील अंबा नदीला मोठा पूर आला असून, नदीचे पाणी थेट पुलावरून वाहत आहे. सलग तिसऱ्या दिवशी पुलावरून पाणी जात असल्यामुळे या भागातील संपर्क पूर्णपणे तुटला असून वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि पाण्याचा अंदाज घेऊनच प्रवास करावा, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## चौकमध्ये महावितरणचा मनमानी कारभार

**। चौक । प्रतिनिधी ।**

चौक पंचक्रोशीत महावितरणच्या कारभारामुळे नागरिक आणि व्यावसायिक कमालीचे त्रस्त झाले असून, वारंवार विशेषतः रात्रीच्या वेळी वीज खंडित होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यामुळे नागरिकांना भर पावसाळ्यात काळोखात रात्र काढावी लागत असून, वाड्या-वस्त्यांवर तर तब्बल चार-चार दिवस वीज गायब असण्याच्या गंभीर घटना घडल्या आहेत. या खंडित वीजपुरवठ्यामुळे स्थानिक आस्थापना, दुकाने, शाळा आणि रूग्णालयांना मोठा फटका बसत आहे. या बिकट परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी दि.९ जुलै रोजी एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महावितरणचे अभियंते व अधिकारी, चौक पंचक्रोशीतील नागरिक, व्यापारी असोसिएशनचे प्रतिनिधी आणि चौकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते. या बैठकीत ग्रामस्थ व व्यापाऱ्यांनी आपला तीव्र रोष व्यक्त केल्यानंतर, अधिकाऱ्यांनी वीज यंत्रणेत तातडीने सुधारणा करून सर्व समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे सकारात्मक आश्वासन उपस्थितांना दिले आहे.






● अलिबाग तालुक्यातील मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाच्या सरावाचा शुभारंभ मंगळवारी (दि.७) अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेवक समीर ठाकूर, ॲड. निवेदिता वाघमारे, सागर भगत, ॲड. अंकित बंगेरा, संजना किर, पिंट्या ठाकूर, ॲड. महेश माहिते यांच्यासह मंडळाचे सर्व सदस्य, हितचिंतक उपस्थित होते.

## गडब परिसरातील जनजीवन विस्कळित

**। गडब ।वार्ताहर ।**

गेले काही दिवस पेण तालुक्याला पावसाने झोडपले असून, त्याचा परिणाम शहरातील जनतेसह ग्रामीण भागातिल जनतेवर झाला आहे. त्यामुळे गडब परिसरातील जनजिवन विस्कळीत झाले आहे. पेण तालुक्यात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामिण भागातिल नदी नाल्यांना पुर आला आहे. येथील शेताच्या बांधाना खांडी जाऊन पुराचे पाणी नागरीकांच्या घरात घुसले आहे. त्यामुळे नागरीकांच्या घरांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तर, पुराचे पाण्याने शेती पाण्याखाली गेली आसल्याने रोपे कुजण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर, पाण्या सोबत वाहुन आलेल्या गाळाखाली रोपे गाडली जाण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे. भातशेतित पाणी शिरल्यामुळे शेतीची कामे ठप्प झाल्याने शेतकरी चितांतुर झाले आहेत. शेतकऱ्यांनी महागडी बियाने आणुन पेरणी केली होती. हा खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाचा जोर असाच राहीला तर भाताची रोपे कुजुन गेली तर त्याचा परिणाम भाताच्या उत्पनांवर होणार असल्याने निसर्गाच्या या लहरी पणा पुढे शेतकरी पुरते हतबळ झाले आहेत.

## पुलालगतचा रस्ता खचला

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**



संततधार पावसामुळे पाली-भिरा मार्गावर नांदगाव येथील सरस्वती नदीवरील पुलाच्या लागतचा रस्ता मोठ्या प्रमाणात खचला आहे. पावसामुळे या पुलाच्या बाजूची माती वाहून गेल्याने डांबरी रस्ता खचून मोठा खड्डा पडला आहे. या मार्गावरून नांदगाव विद्यालयातील विद्यार्थी, एसटी बस तसेच इतर सर्व वाहनांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पुलाचा प्रवेश रस्ता खचल्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला तातडीने लक्ष घालून या ठिकाणी तात्पुरती सुरक्षा व्यवस्था आणि कायमस्वरूपी दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी केली आहे.

थरारक मोहिमेत युवकाची सुटका | जीव धोक्यात घालून बचाव

## एका सेल्फीसाठी मृत्यूशी झुंज

संतोषी म्हात्रे
**। खोपोली ।**



सध्या अतिवृष्टीसह नद्या दुथडी भरून वाहत असून, धबधबे रौद्ररूप धारण करत आहेत. असे असतानाही फोटो आणि थरार अनुभवण्याच्या हव्यासापोटी काही हौशी पर्यटक अजूनही जीवाशी खेळ करत आहेत. अशाच एका तरूणाच्या बेफिकीर निर्णयामुळे बुधवारी (दि.८) संध्याकाळी खोपोली पोलीस, आपत्कालीन यंत्रणा आणि हेल्प फाऊंडेशनच्या सदस्यांना थरारक बचाव मोहीम राबवावी लागली.

मोहम्मद जुहेर शेख (१८) असे या बेफिकीर तरूणाचे नाव असून, तो मुंबई-कुर्ला येथील रहिवासी आहे. तो बुधवारी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास एकटाच खोपोलीत दाखल झाला. त्यानंतर प्रथम झेनिथ वॉटर फॉल परिसरात पोहोचला. धबधब्याचे रौद्र सौंदर्य पाहून तेवढ्यावर समाधान न मानता त्याने आणखी धोकादायक असलेल्या केपी वॉटर फॉलच्या उगमाकडे जाण्याचा निर्णय घेतला. समोर निसरडी चढण, उभा कातळ, दाट झाडी आणि डोंगरमाथ्यावरून कोसळणाऱ्या पाण्याचा प्रचंड प्रवाह त्यात पावसाची सोबत होती. त्याने तेथूनच मागे फिरायला हवे होते. परंतु, तसे न करता तो तब्बल तीन तास संघर्ष करत धबधब्याजवळ पोहोचला. तेथे त्याने सेल्फी काढली, छायाचित्रण केले आणि परतीचा मार्ग धरला. परंतु, सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास परतताना त्याचा पाय घसरला आणि तो कातळावर आदळला. त्यात त्याच्या डाव्या हाताला जखम झाली आणि अंगाला जबर मुका मार बसला. त्यामुळे त्याचे चालणे देखील अवघड झाले. त्याचवेळी त्याने आपत्कालीन हेल्पलाइनवर संपर्क साधला. सायंकाळी ५.०० वाजताच्या सुमारास हेल्प फाऊंडेशनचे प्रशिक्षित बचाव पथक त्या युवकाच्या दिशेने रवाना झाले. भरधाव वेगाने कोसळणारे धबधबे, कंबरेपर्यंत वाहणारे पाण्याचे प्रवाह, निसरडे झालेले कातळ आणि सतत खंडित होणाऱ्या मोबाईल नेटवर्कमुळे युवकाचे अचूक लोकेशन शोधणे कठीण बनले होते. अंधार वाढत असल्याने बचाव मोहिमेची जोखीमही वाढत होती. अखेर अनेक अडथळे पार करत हेल्प फाऊंडेशनचे सदस्य मोहम्मद जुहेर शेखने सांगितलेल्या खुणांपर्यंत पोहोचले आणि त्याला ताब्यात घेतले. त्यांनतर त्याची तपासणी केली आणि पुन्हा परतीचा धोकादायक प्रवास सुरू झाला. अखेर अनेक अडथळे दूर करत बचाव पथकाने युवकाला सुरक्षित खाली आणले. त्यानंतर खोपोली पोलीस ठाण्यात त्याला आणल्यानंतर पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी त्याची समजूत काढली. त्यांनी नातेवाईकांशी संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली.




## देवेंद्रांची आदळआपट

राज्यातील पूरस्थितीबाबतच्या चर्चेला उत्तर देताना बुधवारी विधानसभेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बरेच आकांडतांडव केले. एका राज्याच्या मुख्यमंत्र्याला, त्यातही महाराष्ट्राच्या, ही आदळआपट शोभणारी नाही. मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर सोमवारी दरड कोसळली. त्यामुळे वाहतूक दिवसभर बंद ठेवावी लागली. खंडाळा येथील प्रवेशद्वाराजवळची कमान तुटून खाली पडली. इतके झाल्यावर सरकारवर टीका ही होणारच. प्रकल्पाबाबत प्रश्न विचारले जाणारच. पण असे करणे म्हणजे फडणवीसांना बदनाम करणे होत नाही. यातून महाराष्ट्राची बदनामी होत नाही. पण कोणत्याही गोष्टीत टीका झाली की अमुकचा अपमान झाला, देशाच्या विरोधी बोलले गेले असे म्हणण्याची एक पध्दत भाजपवाल्यांनी रूढ केली आहे. इंग्रजीत कुण्याला वेडे ठरवा आणि मारून टाका अशी म्हण आहे. त्या धर्तीवर आपल्यावर काहीही टीका झाली की देवाचा, देशाचा किंवा मग कोण्या महापुरुषाचा अपमान झाला असा कांगावा करायचा आणि विरोधकांना देशद्रोही ठरवायचे हे भाजपचे तंत्र आहे. काही वेळेला या टीकाकारांवर फालतूचे पोलिसी गुन्हे दाखल करण्यापर्यंतदेखील यांची मजल गेली आहे. नरेंद्र मोदी निवडून आल्यापासून हा प्रकार चालू आहे. मोदींच्या पहिल्या कार्यकाळात मोदींवर जरा जरी टीका झाली की ही देशावरच टीका आहे असे अंधभक्त म्हणत असत. पण लोकांनीच तो प्रकार हाणून पाडला. आज सोशल मिडियामध्ये मोदींवर सर्वाधिक जोक्स होत असतात. याचे कारण अंधभक्तांचे अतिरेकी मोदी-समर्थन. मोदींपासून प्रेरणा घेऊन राज्यातले नेतेही असेच वागत आहेत. देवेंद्र फडणवीसांचे वागणे हे त्यातलाच नमुना आहे. कनेक्टिंग लिंक ही आपल्याच अभियंत्यांनी बांधली आहे. त्यातील सर्वात उंच केबल पूल व लांब बोगदा यांचे सर्वांनाच कौतुक आहे. पण हे काम करताना सह्याद्रीच्या डोंगरांना धोका तर पोचत नाही ना अशी शंका तेव्हाही व्यक्त केली गेली होतीच. लिंकचे उद्घाटन होऊन दोनच महिन्यांमध्ये त्यातील रस्त्यावर खड्डे पडले. लगेच दोन दिवसांनी वरून दरड कोसळली. त्यामुळे साहजिकच याबाबतच्या शंका वाढल्या. त्याच विरोधकांनी उपस्थित केल्या. त्यात आक्षेप घेण्यासारखे काही नाही.

### जे पेरले तेच उगवले

आजकाल सोशल मिडियामधून खालच्या पातळीवरची टीका होते हे खरे आहे. पण याची सुरुवात भाजप परिवारानेच केली. नेहरू, इंदिरा गांधी, सोनिया, मनमोहन यांच्यावर अत्यंत असभ्य, गुंडांसारखी टीका सोशल मिडियातून भाजपवाल्यांनी केली. अशी टीका करणाऱ्यांचे कान उपटणे तर सोडाच, पंतप्रधान मोदींपासूनचे नेते त्यांचे फॉलोअर्स असल्याचे दिसले. त्यातून भाजप परिवार आणखी चेकाळला. असे असताना आज भाजपवर असाच चिखल उडवला जात असेल तर त्याबद्दल तक्रार करण्याचा नैतिक अधिकार निदान भाजपला तरी नाही. या पलिकडे राजकीय विरोधकांनी केलेली टीका अतिशय सभ्य अशा प्रकारची होती. देवेंद्र फडणवीस दावा करतात त्याप्रमाणे, कनेक्टिंग लिंक तुटली असे विरोधी नेत्यांपैकी कोणीही म्हटलेले नाही. सात हजार कोटी रुपये खर्चून बांधलेल्या प्रकल्पात असे का व्हावे असा प्रश्न जरूर विचारला आहे. तो प्रश्न जनतेच्या मनातला आहे. किंबहुना या सर्वांची मेख इथेच आहे. कनेक्टिंग लिंकचा बोगद्याला सध्या काही झाले नाही हे खरे आहे. पण बोगदा बांधताना तिथले डोंगर, त्यांची क्षमता इत्यादींचा नीट अभ्यास झाला आहे का अशी लोकांची शंका आहे. हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प उभे राहतात तेव्हा त्यात कंत्राटदार व ते कंत्राट देणारे दोघांचाही स्वार्थ असतो. या प्रकरणातील कंत्राटदार नवयुग कंपनी तर भयंकर बदनाम आहे व तिच्या उत्तराखंडमधील बोगद्यात अशीच दरड कोसळली होती. शिवाय तिने भाजपला शेकडो कोटींचा निवडणूक निधी दिल्याने संशय अधिक गहिरा झाला आहे. या कामात घाईगडबड झाली आहे की, जाणकारांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष झाले आहे का असा संशय सामान्यांना येणे साहजिक आहे. कारण, मुख्यमंत्र्यांनी पहिल्या दिवशी सांगितल्याप्रमाणे अभूतपूर्व अशी शंभर टन वजनाची दरड इथे कोसळली. असा अभूतपूर्व प्रकार घडण्यास या बोगद्याचे व पुलाचे काम तर कारणीभूत नाही ना असा प्रश्न उभा राहणे साहजिक आहे.

### बाष्कळपणा बंद करा

कोणत्याही धरणात प्रचंड पाणी साठवले जाते. त्या पाण्याचा जमिनीवर मोठा दाब तयार होतो. त्यामुळे जमिनीच्या अंतर्गत भागात हालचाली वाढून भूकंप होतात असा एक प्रवाद पूर्वी होता. कोयना धरण बांधताना या एका मुद्द्यावरून विरोध झाला होता. पण हा विरोध केला म्हणून आमची बदनामी झाली असे यशवंतराव चव्हाण तेव्हा म्हणाले नाहीत. त्यांनी लोकांना विश्वासात घेतले. फडणवीस म्हणतात की पाऊस कसा कोसळतो, दरड कशी पडू शकते याबाबत यंदा काही नव्या गोष्टी आम्हाला कळल्या. लोकांचा आक्षेप हाच आहे. अशा गोष्टींचा अभ्यास करून सर्व संभाव्य शक्यतांचा विचार करणे कोणत्याही प्रकल्पांमध्ये आवश्यक असते. या सर्व शक्यता ध्यानात घेतल्या गेल्या आहेत की नाही हाच लोकांचा प्रश्न आहे. ही दरड कोसळून काही माणसांचा जीव जाऊ शकला असता. अशी किंमत देऊन दरवेळी नव्याने काही शिकणे व प्रकल्पांमध्ये सुधारणा करत राहणे याला चांगले धोरण म्हणत नाहीत. मिसिंग लिंकवर खड्डे पडले तेव्हाही फडणवीसांनी असाच दावा केला होता. पहिल्या पावसात रस्त्यासारख्या कामाची परीक्षा घेतली जात असते व नंतर ते सुधारले जाते असे त्यांचे म्हणणे होते. असे लोकांच्या पैशाने व त्यांच्या जिवाची किंमत देऊन जगात कुठेही प्रकल्प केले जात नाहीत. ते तसे होत असतील त्यावर टीका होणार व ती झालीच पाहिजे. आज तंत्रज्ञान प्रचंड पुढे गेले आहे. अनेक गोष्टींची समीकरणे एकाच वेळी मांडणे व कशाचे काय परिणाम होतील हे अजमावणे शक्य झाले आहे. इतक्या काटेकोर काळजीनंतरही अपघात होऊ शकतात. कारण, निसर्गाचे वर्तन सर्वस्वी माणसाच्या कह्यात येऊ शकत नाही. अशा वेळी मुख्यमंत्र्यांनी नम्र भूमिका घेणे व चुका झाल्या असतील तर सुधारू असे म्हणणे अपेक्षित आहे. त्याऐवजी हिंमत होती म्हणून कनेक्टिंग लिंक बांधली अशी रस्त्यावर मारामारी करताना वापरतात तशी भाषा त्यांनी केली. इथे हिमतीचा नव्हे तर साधकबाधक विचाराचा व शहाणपणाचा प्रश्न आहे. तो दाखवला गेला आहे की नाही याबाबत शंका आहे. पूर्वीचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी याचमुळे या प्रकल्पाला २०१३ मध्ये स्थगिती दिली होती. मुळात हा प्रकल्प करण्याची कल्पना त्यांच्याच सरकारची होती. त्यामुळे त्यांच्यात ती हिंमत नाही असे म्हणणे बाष्कळपणाचे आहे. या प्रस्तावाबाबतच्या तांत्रिक बाबी अधिक तपासा आणि खर्चाचे हिशेबही पुन्हा करा असा शेरा आपण दिला होता असे चव्हाण यांचे म्हणणे आहे. त्यांना मूर्ख ठरवणे हे देवेंद्रांना शोभत नाही. ज्यांनी कधी एक पूल किंवा रस्तादेखील बांधला नाही ते आपल्यावर टीका करताहेत असेही देवेंद्र म्हणाले. भारतात पूल, रस्ते, धरणे, कारखाने वगैरे २०१४ नंतरच सुरू झाले असा नवा इतिहास देवेंद्र आणि परिवाराला रचायचा आहे. असला कंडम इतिहास रचणारे मोठे पूल व बोगदे बांधतात तेव्हा शंका येणे साहजिक आहे.

विचार

# पुन्हा मोनोरेल...

**प्रा. सुखदेव बखळे**

*अनेक वर्षांपासून चर्चेत असलेली मात्र बंद असलेली मुंबई मोनोरेल पुन्हा सुरू होण्याची बातमी मुंबईकरांसाठी आनंदाची ठरत आहे. विशेषतः मुंबईच्या पूर्व उपनगरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी हा प्रकल्प वाहतुकीच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरू शकतो. चेंबूर मेट्रो स्थानकाशी होणारी जोडणी, अत्याधुनिक तांत्रिक सुधारणा आणि वाढलेली प्रवासी सुविधा यामुळे मोनोरेल पुन्हा शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान मिळवू शकते.*



मुंबईमध्ये मोनोरेल सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे शहरातील गर्दी कमी करणे आणि पर्यायी सार्वजनिक वाहतूक पर्याय उपलब्ध करून देणे हा होता. पारंपरिक रेल्वेमार्ग आणि रस्त्यांवर वाढत असलेल्या ताणामुळे नवीन वाहतूक व्यवस्थेची गरज निर्माण झाली होती. मोनोरेल ही एका उंच मार्गिकेवर धावणारी आधुनिक रेल्वे प्रणाली आहे. कमी जागेत उभारता येणारी आणि शहरी भागात प्रभावीपणे कार्य करू शकणारी ही व्यवस्था अनेक देशांमध्ये यशस्वी ठरली आहे. मुंबईतही या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवाशांना जलद आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुंबई मोनोरेलचा मार्ग चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक असा सुमारे वीस किलोमीटर लांबीचा आहे. या मार्गामुळे पूर्व उपनगरांपासून दक्षिण-मध्य मुंबईपर्यंतचा प्रवास अधिक सोपा होतो. पहिला टप्पा २०१४ मध्ये सुरू झाला तर दुसरा टप्पा २०१९ मध्ये कार्यान्वित झाला. सुरुवातीच्या काळात या प्रकल्पाबाबत मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या होत्या; मात्र काही तांत्रिक समस्या, मर्यादित गाड्या आणि देखभालीशी संबंधित अडचणी यामुळे मोनोरेलला अपेक्षित यश मिळू शकले नाही, तरीही या मार्गाचे महत्त्व कायम राहिले. कारण इतर रेल्वे पर्याय तुलनेने कमी असलेल्या ठिकाणांना तो जोडतो. मोनोरेल पुन्हा सुरू करण्यासाठी प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या आहेत. नवीन रोलिंग स्टॉकची जोडणी, सुरक्षा व्यवस्थेतील बदल आणि प्रगत 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) सिग्नलिंग प्रणालीचा वापर यामुळे संपूर्ण नेटवर्क अधिक विश्वासार्ह बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या यंत्रणेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या 'सीबीटीसी' तंत्रज्ञानामुळे गाड्यांमधील अंतर अधिक अचूकपणे नियंत्रित करता येते. त्यामुळे सुरक्षितता वाढते आणि सेवा अधिक नियमितपणे चालवता येते. आधुनिक महानगरांमध्ये अशा प्रकारची प्रणाली मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. याशिवाय स्थानकांवरील सुविधा, नियंत्रण व्यवस्था आणि तांत्रिक उपकरणांचेही आधुनिकीकरण करण्यात आले आहे. मोनोरेलच्या नव्या इनिंग्जमधील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे चेंबूर मेट्रो स्थानकाशी होणारी जोडणी. हे स्थानक मेट्रो नेटवर्कमधील महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. व्ही. एन. पुरव मोनोरेल स्थानक आणि चेंबूर मेट्रो स्थानक यांच्यातील अंतर अत्यंत कमी असल्याने प्रवाशांना एका वाहतूक व्यवस्थेतून दुसऱ्या व्यवस्थेत सहज जाता येणार आहे. यामुळे मुंबईतील बहुस्तरीय सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला अधिक बळ मिळणार आहे. आजच्या काळात कोणतीही वाहतूक व्यवस्था स्वतंत्रपणे प्रभावी ठरत नाही. विविध वाहतूक साधनांमध्ये सुलभ बदल करता येणे हेच यशस्वी वाहतूक व्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य असते. चेंबूरमधील ही जोडणी त्याच दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पूर्व उपनगरांमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना या पुनरारंभाचा थेट फायदा होणार आहे. चेंबूर, कुर्ला, टिळकनगर, वडाळा आणि आसपासच्या परिसरातील लोकांना कमी वेळेत आपल्या गंतव्यस्थानी पोहोचता येईल. रस्त्यांवरील वाहतूक कोंडीमुळे अनेकदा प्रवाशांचा मौल्यवान वेळ वाया जातो. सार्वजनिक वाहतुकीचा प्रभावी पर्याय उपलब्ध झाल्यास हा वेळ मोठ्या प्रमाणात वाचू शकतो.

येत्या काळात कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी मोनोरेल हा नव्याने एक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा पर्याय ठरू शकतो. याशिवाय मेट्रोशी जोडणी झाल्यामुळे शहरातील इतर भागांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल. मुंबईसारख्या शहरांमध्ये वाढते वायुप्रदूषण ही चिंतेची बाब आहे. खासगी वाहनांचा वापर जितका वाढतो, तितका पर्यावरणावरील ताण वाढतो. विद्युत ऊर्जेवर चालणारी मोनोरेलसारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पर्यावरणपूरक मानली जाते. अधिक लोक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करू लागल्यास इंधनाचा वापर कमी होईल आणि प्रदूषणात घट होण्यास मदत होईल. शाश्वत शहरी विकासासाठी अशा प्रकारच्या प्रकल्पांची आवश्यकता भविष्यात अधिक वाढणार आहे. वाहतूक व्यवस्था आणि आर्थिक विकास यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. उत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध असणाऱ्या भागांमध्ये गुंतवणूक वाढते, रोजगारनिर्मिती होते आणि व्यावसायिक संधी निर्माण होतात. मोनोरेलच्या पुनरारंभामुळे पूर्व उपनगरांमधील अनेक भागांमध्ये व्यावसायिक हालचाली वाढू शकतात. लहान-मोठे उद्योग, दुकाने, सेवा व्यवसाय आणि रिअल इस्टेट क्षेत्रालाही याचा सकारात्मक परिणाम जाणवू शकतो. वाहतुकीतील सुधारणा म्हणजे केवळ प्रवासाची सोय नव्हे, तर संपूर्ण स्थानिक अर्थव्यवस्थेला मिळणारी नवी ऊर्जा असते. मोनोरेल पुन्हा सुरू करणे हा प्रकल्पाचा पहिला टप्पा आहे; मात्र दीर्घकालीन यशासाठी सातत्यपूर्ण देखभाल आणि दर्जेदार सेवा अत्यावश्यक आहे.

येत्या काळामध्ये गाड्यांची नियमित उपलब्धता, वेळेचे पालन, स्वच्छता, सुरक्षा आणि प्रवाशांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद या बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत. त्यामुळे अडचणींची पुनरावृत्ती टाळणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान असेल. तसेच प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी सुलभ तिकीट प्रणाली, एकात्मिक प्रवास कार्ड आणि इतर वाहतूक साधनांशी समन्वयावरही भर देणे आवश्यक आहे. मुंबईमध्ये मेट्रो नेटवर्कचा विस्तार वेगाने सुरू आहे. त्यासोबत मोनोरेलचे प्रभावी पुनरुज्जीवन झाले, तर शहराला बहुआयामी वाहतूक व्यवस्था मिळू शकते. रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि बस सेवा यांचे एकात्मिक जाळे उभे राहिल्यास मुंबईतील वाहतूक व्यवस्थेत मोठे परिवर्तन घडू शकते. भविष्यात अशा प्रकल्पांमुळे नागरिकांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. 'स्मार्ट सिटी'च्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुंबईसाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जाऊ शकते. मुंबई मोनोरेलचे पुनरागमन ही केवळ एका वाहतूक सेवेची पुनर्सुरुवात नाही, तर शहराच्या वाहतूक व्यवस्थेतील नव्या अध्यायाची सुरुवात आहे. प्रशासनाने सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह सेवा दिल्यास मोनोरेल मुंबईच्या वाहतुकीतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनू शकते. पूर्व उपनगरातील नागरिकांसाठी ही सुविधा वेळेची बचत, आरामदायी प्रवास आणि अधिक चांगल्या जीवनमानाची नवी संधी घेऊन येणार आहे. त्यामुळे मुंबईकरांच्या अपेक्षा आता या पुनरारंभाकडे लागल्या आहेत.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून दररोज लाखो लोक रोजगार, शिक्षण, व्यवसाय आणि विविध कारणांसाठी शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास करतात. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि मर्यादित रस्ते यामुळे वाहतूक कोंडी ही मुंबईकरांसमोरील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक बनली आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार आणि आधुनिकीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. मुंबई मोनोरेलची संकल्पना २००८ मध्ये पुढे आली. वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी सार्वजनिक वाहतूक प्रणालीची गरज निर्माण झाली होती. त्यातून मोनोरेल प्रकल्पाचा जन्म झाला. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून शहरातील दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये कमी जागेत प्रभावी वाहतूक व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न होता. या प्रकल्पाचे दोन टप्प्यांमध्ये उद्घाटन करण्यात आले. पहिला टप्पा वडाळा ते चेंबूरदरम्यान ८.८ किलोमीटर लांबीचा असून दोन फेब्रुवारी २०१४ रोजी सुरू झाला. दुसरा टप्पा वडाळा ते संत गाडगेमहाराज चौक दरम्यान ११.२ किलोमीटर लांबीचा असून चार मार्च २०१९ रोजी प्रवाशांसाठी खुला करण्यात आला. सुरुवातीला या प्रकल्पाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले गेले; मात्र विविध तांत्रिक आणि व्यवस्थापकीय अडचणींमुळे मोनोरेलला अपेक्षित प्रतिसाद मिळू शकला नाही. काही काळानंतर सेवा मर्यादित स्वरूपात सुरू राहिली आणि नंतर व्यापक सुधारणा करण्यासाठी ती स्थगित करण्यात आली.

मोनोरेल सेवा बंद करण्यामागे अनेक कारणे होती. जुन्या रेक्सची क्षमता मर्यादित होती आणि काही वेळा तांत्रिक बिघाडामुळे सेवा विस्कळीत होत होती. प्रवाशांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था आवश्यक होती. याशिवाय आधुनिक सिग्नलिंग प्रणालीची गरजही जाणवत होती. त्यामुळे प्रगत 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीटीबीसी) तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या तंत्रज्ञानामुळे गाड्यांचे संचालन अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम होते. तसेच नवीन रोलिंग स्टॉक, सुरक्षा यंत्रणांचे आधुनिकीकरण आणि देखभाल व्यवस्थेतील सुधारणा यासाठीही मोठ्या प्रमाणात काम करण्यात आले. या सर्व सुधारणांसाठी काही काळ सेवा स्थगित ठेवणे अपरिहार्य होते. आता ही कामे जवळपास पूर्ण झाली असून मोनोरेल पुन्हा सेवेत येण्यास सज्ज आहे.

चर्चा आजची

# शासकीय शाळांच्या गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह का?

**सुयोग आंग्रे**



सध्या देशाचे शिक्षण सरकारी आणि खासगी अशा प्रत्येक स्तरावर दोन विभागांमध्ये विभागले गेले आहे. सरकारकडे संसाधने नाहीत, त्यामुळे शिक्षणात खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन द्यावे लागेल. समाजातील ज्या वर्गाला शिक्षणाची सर्वाधिक गरज आहे तो सरकारी शाळांवर अवलंबून आहे. तो मजबुरीने हे स्वीकारत आहे, कारण त्याची गुणवत्ता आणि विश्वासार्हता आज प्रश्नाभोवती आहे. सरकारी व्यवस्थेत नियमित सेवेत कार्यरत असलेला प्रत्येक साधनसंपन्न व्यक्ती आपल्या मुलांना सामान्य सरकारी शाळांऐवजी खासगी शाळेत पाठवण्यास प्राधान्य देत आहे. येथे दोन वर्ग तयार करण्यात आले आहेत. सरकारी अनुदानित विद्यापीठांमध्ये प्रवेशाची स्पर्धा इतकी चुरशीची झाली आहे की, कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये जावे लागते. कोचिंग हा निव्वळ व्यवसाय आहे. असुरक्षित वयोगटातील तरुण लोक ज्या परिस्थितीत येथे येतात, राहतात आणि अभ्यास करतात ते तणाव, चिंता आणि चिंता यांचे अस्वीकार्य स्तर निर्माण करतात. इयत्ता ११-१२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेची तयारी करावी लागते. जर त्यांना किमान गुण मिळाले नाहीत तर ते पुढील स्पर्धा परीक्षेत बसू शकणार नाहीत. मग त्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर व्यावसायिक स्पर्धा परीक्षांची तयारी करणे, कोचिंगमध्ये भाग घेणे आणि तेथे जवळपास दररोज स्पर्धांमध्ये पुढे राहणे ही जबाबदारी त्यांना पेलावी लागते. या सगळ्यांसोबतच त्यांच्या पालकांच्या अपेक्षा आणि अपेक्षांचाही त्यांच्यावर सतत वाढत जाणारा दबाव असतो. दुसरीकडे, समाजातील नैतिकतेकडे वाढत चाललेली ढिलाई आणि व्यवस्थेतील विवेकबुद्धीचा अभाव यामुळे पेपरफुटीचे असे जाळे निर्माण झाले आहे, ज्यावर कोणताही उपाय दिसत नाही. कॉपी आणि पत्रकबाजीत काही माफिया अनेक दशकांपासून गुंतले असून ते सरकारी यंत्रणा आणि न्याय व्यवस्थेची चेष्टा करत असल्याचेही बोलले जात आहे.

भविष्यात सरकारी यंत्रणा नियमांची अंमलबजावणी करू शकेल, असा विश्वास कुणालाही नाही. हा संबंध इतका मजबूत आहे की सामान्य माणसाला तो तोडणे अशक्य वाटते. कॉपी माफिया, सलवार गँग, फॉर्म लीक इत्यादी सर्व फक्त सुशिक्षित लोक चालवतात आणि चालवतात. या समस्यांवर त्वरित उपाय शोधणे आवश्यक आहे, परंतु शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी दीर्घकालीन उपाय शोधावे लागतील. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा परिस्थितीचे प्रामाणिकपणे विश्लेषण केले जाते ज्यामुळे विवेकशीलता आणि नैतिकतेची घसरण केवळ पुस्तकांपुरतीच मर्यादित राहते. १४ वर्षांपर्यंतच्या प्रत्येक मुलाला सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्याच्या सूचना राज्यघटनेच्या रचनाकारांनी दिल्या होत्या. ही जबाबदारी सुरुवातीपासूनच सर्व सरकारांनी पार पाडली असती, सर्व मुलांना शिक्षणाची समान संधी देण्याच्या भावनेला व्यावहारिक स्वरूप दिले असते, त्यांची जबाबदारी स्वीकारून त्यासाठी साधनसामग्री उपलब्ध करून दिली असती, प्रत्येक वर्गातील आणि आर्थिक स्थितीची मुले एकाच शाळेत एकत्र शिकली असती, तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती. सरकारने हे केले असते तर समाजच पुढे आला असता. संसाधनांची कमतरता काही वर्षांत आपोआप संपेल. सरकारी शाळांकडे होणारे घोर दुर्लक्ष, तेथील शिक्षकांना सर्व प्रकारची गैर-शैक्षणिक कामे करायला लावणे, नियमित नियुक्त्या न करणे हे काही अक्षम्य निर्णय आहेत ज्यांचा प्रभाव कमी करणे आणि थांबवणे आवश्यक आहे. तथापि, शैक्षणिक धोरण-२०२० नंतर, भारतीय संस्कृतीच्या प्रकाशात धोरण तयार करण्यात आले असून त्यात भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व मान्य करण्यात आले आहे, अशी आशादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. ही अत्यंत संवेदनशील क्षेत्रे आहेत, त्यांना योग्य महत्त्व दिल्याशिवाय शिक्षणात खऱ्या अर्थाने समानतेकडे वाटचाल करणे कठीण होईल. कोठारी आयोगाने (१९६४-६६) जीडीपीच्या सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची शिफारस गांभीर्याने करावी लागेल. सरकारी शाळांमध्ये शिक्षकांच्या नियमित नियुक्त्या मागे ढकलणे हे शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आत्मघातकी ठरले आहे. सरकारी शाळांमध्ये अल्प मानधनावर शिक्षकांची नियुक्ती, विद्यापीठांमध्ये अतिथी शिक्षक, व्याख्यानांवर आधारित मानधन आदी प्रयोगांनी शिक्षणाचा दर्जा, संशोधनातील उत्कृष्टता आणि शिक्षकांचा उत्साह व समर्पण हिरावून घेतले. सरकारने आता ठरवावे की केवळ नियमित शिक्षकांची नियुक्ती केली जाईल. स्थानिक पातळीवर सेवानिवृत्त शिक्षकांच्या सेवा तीन महिन्यांसाठी घेण्याचे अधिकार मुख्याध्यापकांना द्यावेत. हा अधिकार विद्यापीठ स्तरावर कुलगुरूंना असायला हवा. एका दिवसासाठीही अभ्यास वाया जाऊ नये, हा उद्देश आहे. निवडणुका, जनगणना, पशुगणना इत्यादी कामांसाठी शिक्षकांचा वापर करून शाळा बंद करण्याची प्रथा विकसित भारतातही चालू राहील का? त्यामुळे शिक्षकांचे मनोबल ढासळते आणि देशाची ज्ञान-कौशल्य संपत्ती कमी होते. व्यवस्थेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. नेतृत्वाला चालना देण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न करावे लागतील, तरच प्रत्येक स्तरावर जबाबदारीची जाणीव वाढेल. यातून इतर उपायही आपोआप निघतील. सद्यस्थितीत प्रगती आणि विकासाचा भक्कम आधार म्हणून सिद्ध झालेले शिक्षण, गुणवत्ता, उत्कृष्टता, जीवनोपयोगी आणि उत्पादन कौशल्यांनी परिपूर्ण असेल तेव्हाच भविष्यात त्याचे अपेक्षित महत्त्व सिद्ध करू शकेल.

लोकसंसद

## जगातील सहावे सर्वांत शक्तिशाली भारतीय हवाई दल!

'वर्ल्ड डायरेक्टरी ऑफ मॉडर्न मिलिट्री एअरक्राफ्ट' (डब्ल्यूडीएमएमए) ने 'ट्रू व्हॅल्यू रेटिंग' (टीव्हीआर) निकषानुसार जगातील १०३ देशातील लष्कर, नौदल आणि मरीन दलांच्या हवाई शाखांचा समावेश असलेल्या १२९ हवाई दलांची जागतिक क्रमवारी नुकतीच प्रकाशित केली. टीव्हीआर' निकषानुसार ही क्रमवारी ठरवण्यासाठी केवळ विमानांची संख्या न पाहता यामध्ये विमानांचे आधुनिक तंत्रज्ञान, एकूण ताफ्याचे संतुलन, हल्ला व बचाव करण्याची अचूक क्षमता आणि भक्कम लॉजिस्टिक (पुरवठा व व्यवस्थापन) सहाय्य या सर्व गोष्टींचे अचूक संतुलन मोजले जाते. या 'टीव्हीआर' निकषानुसार जगातील शक्तिशाली हवाई दलामध्ये पहिल्या पाचमध्ये एकट्या अमेरिकेची १) अमेरिकी वायुसेना (टीव्हीआर २४२.९),२) अमेरिकी नौसेना एव्हिएशन (१४२.४), ४) अमेरिकी थलसेना एव्हिएशन (११२.६) आणि ५) अमेरिकी मरीन कॉप्स एव्हिएशन (८५.३) ही चार हवाई दले असून तिसऱ्या स्थानावर रशियन वायुसेना (टीव्हीआर ११४.२) आहे तर भारतीय वायुसेनेला (टीव्हीआर ६९.४) जगातील सहावे सर्वांत शक्तिशाली हवाई सामर्थ्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. भारताचे हे जागतिक पातळीवरचे स्थान भारतीय हवाई दलाचे वाढते सामर्थ्य, गंभीर परिस्थितीवर त्वरित कारवाई करण्याची क्षमता, अत्याधुनिक लढाऊ विमाने, स्वदेशी तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अचूक युद्ध रणनीती यामुळे प्राप्त झाले आहे. चीन, जपान, इस्रायल आणि फ्रान्स अशा अनेक बलाढ्य देशांना मागे टाकत मिळालेले हे यश समस्त भारतीयांना सुरक्षिततेची आणि अभिमानाची अनुभूती देणारे आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# जागतिक ऊर्जा स्वातंत्र्य दिन

जागतिक ऊर्जा स्वातंत्र्य दिन हा एक स्मरणपत्र आहे की ऊर्जा ही आपल्या मूलभूत गरजांपैकी एक आहे. प्रागैतिहासिक काळातील आपल्या पूर्वजांना जास्त ऊर्जेची गरज नव्हती. पण अग्नीचा शोध लागल्यावर हळूहळू उर्जेचा स्रोत असण्याची गरज वाढत गेली. आगीचे इंधन सोपे, उपलब्ध आणि विनामूल्य होते. पण कालांतराने आपल्या गरजा वाढल्या आहेत. कालांतराने अनेक नवनवीन शोध आले आणि प्रत्येक गोष्टीला ऊर्जेची गरज वाढत गेली, त्यामुळे सरतेशेवटी इंधनाचे नवीन प्रकार शोधले गेले आणि वापरले गेले. नेव्हिगेशन सुरू झाल्यापासून आम्ही पवन ऊर्जा वापरण्यास सुरुवात केली. नैसर्गिक तेल नंतर द्रव इंधनाचे पहिले रूप म्हणून सादर केले गेले.

आपण दरवर्षी १० जुलै रोजी जागतिक ऊर्जा स्वातंत्र्य दिन साजरा करतो. पर्यायी इंधनाच्या महत्त्वाविषयी जागरुकता वाढवणे हा त्याचा उद्देश आहे. आपण सध्या आपले स्रोत म्हणून जीवाश्म इंधन वापरत आहोत आणि त्यांना बदलण्याची गरज आहे. जीवाश्म इंधन अपरिवर्तनीय असतात आणि त्यांना तयार होण्यासाठी लाखो वर्षे खूप वेळ लागतो, ते प्रदूषणाचे स्रोतही आहेत. या दिवशी, आम्ही जीवाश्म इंधनाविरुद्ध जनजागृती करतो आणि उर्जेचे अक्षय आणि तुलनेने प्रदूषण न करणारे पर्यायी स्रोत शोधण्यावर लक्ष केंद्रित करतो.

१० जुलै रोजी दरवर्षी साजरा होणारा जागतिक ऊर्जा स्वातंत्र्य दिन हा जगभरातील नागरिकांना आणि सरकारांना स्वच्छ, शाश्वत आणि पर्यायी ऊर्जेच्या वापराबाबत जागरूक करणारा एक महत्त्वाचा दिवस आहे. सौर, पवन, बायोगॅस, जल आणि भूऔष्णिक ऊर्जेचे महत्त्व अधोरेखित करून हा दिवस जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करण्याचे आणि पर्यावरणाच्या रक्षणाचे आवाहन करतो.

या दिवसाचे मूळ २००५ साली लॉस एंजेलिस (कॅलिफोर्निया) येथे घातले गेले. हरित ऊर्जेचे पुरस्कर्ते मायकेल डी. अँटोनोविच यांनी या उपक्रमाची सुरुवात केली. विशेष बाब म्हणजे हा दिवस महान शास्त्रज्ञ निकोला टेस्ला यांच्या वाढदिवशी साजरा केला जातो, जे एक शतकापूर्वीच अक्षय ऊर्जेच्या संकल्पना मांडत होते.

जगातील वाढत्या प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तींमुळे आज ऊर्जा स्वातंत्र्य ही संकल्पना अधिक गरजेची झाली आहे. विशेषतः विद्युत वाहनांचा वाढता प्रसार, वैयक्तिक घरांवर सौर पॅनेल बसवणे, ग्रामीण भागात बायोगॅस वापरणे हे लक्षणीय बदल आहेत. अक्षय ऊर्जा वापरल्याने कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन सुमारे ३०% पर्यंत कमी होऊ शकते, असे शास्त्रज्ञ सांगतात.भारत एक विकसनशील आणि ऊर्जा-गव्हरण देश असून, येथे अजूनही लाखो कुटुंबांना शाश्वत व स्वच्छ ऊर्जेची गरज आहे. ऊर्जेच्या स्वावलंबनासाठी भारताने सौर ऊर्जा प्रकल्प, वारा ऊर्जा आणि जलविद्युत प्रकल्पांवर भर देणे सुरू केले आहे. प्रधानमंत्री कुसुम योजना, सौर ऊर्जा पार्क, आणि विद्युत वाहनांना प्रोत्साहन धोरणे यांसारख्या उपक्रमांनी भारत ऊर्जा स्वातंत्र्याकडे सकारात्मक वाटचाल करत आहे. भारतासाठी ऊर्जा स्वातंत्र्य म्हणजे परकीय इंधनांवरील खर्चात बचत, ऊर्जा सुरक्षेची हमी आणि पर्यावरणीय शाश्वततेचे लक्ष्य गाठणे. याशिवाय, स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात उद्योगधंद्यांसाठी नवे रोजगार, नव्या संधीही निर्माण होत आहेत. ऊर्जा स्वातंत्र्य ही केवळ सरकारांची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. आपण आपल्या घरात सौर पॅनेल लावू शकतो, कमी वीज वापरणारे उपकरण वापरू शकतो, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करू शकतो ही सर्व लहान पावले ऊर्जा बचतीसाठी मोलाची ठरतात. आजच्या दिवशी समाज, उद्योग, शेतकरी आणि तरुण पिढी यांना आवाहन आहे की त्यांनी ऊर्जा स्वातंत्र्याच्या दिशेने ठोस पावले उचलावीत. स्वच्छ, हरित आणि उज्ज्वल भविष्यासाठी हेच आजचे खरे ध्येय आहे.

# आदिवासींना हक्काचा सातबारा

## ● वनपट्टाधारकांसाठी नमुना ७ ई आणि १२ ई लागू

। मुंबई । प्रतिनिधी ।



राज्यातील लाखो आदिवासी आणि पारंपरिक वननिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा एक अत्यंत क्रांतिकारक आणि ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आता आदिवासींना स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील दोन लाखांपेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांच्या हक्काचा मार्ग मोकळा झाला आहे.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, आतापर्यंत वनपट्टा मंजूर झाल्यानंतर आदिवासी बांधवांची नावे सातबारा उताऱ्यावरील केवळ इतर हक्क या सदरात नोंदवली जात होती, तर मुख्य मालकी हक्काच्या जागी महाराष्ट्र शासन वने असा उल्लेख असायचा. या तांत्रिक अडचणीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळण्यात, बँकांकडून कृषी पीक कर्ज घेण्यात, कृषी विभागाच्या योजनांचा लाभ उठवण्यात आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसानभरपाई मिळवण्यात प्रचंड व्यावहारिक अडचणी येत होत्या. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली होती.

समितीच्या शिफारशीनुसार सरकारने विशेष बाब म्हणून वनपट्टाधारकांसाठी स्वतंत्र सातबारा नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ई तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. गाव नमुना ७ ई मध्ये थेट संबंधित वनपट्टाधारकाची नोंद केली जाईल. तर गाव नमुना १२ ई मध्ये संबंधित जमिनीवरील पिकांची नोंद घेतली जाईल.

या नवीन निर्णयामुळे आदिवासी बांधवांना आता ॲग्रीस्टॅकसह सर्व कृषी विषयक शासकीय सुविधांचा लाभ अधिक सुलभतेने आणि तातडीने घेता येणार आहे.

हा निर्णय तळागाळातील शेवटच्या आदिवासी बांधवापर्यंत पोहोचवण्यासाठी महसूलमंत्री बावनकुळे यांनी सभागृहातील सर्व लोकप्रतिनिधींना आवाहन केले. ते म्हणाले की, सर्व आदिवासी क्षेत्रातील आमदारांनी आपापल्या विधानसभा मतदारसंघात तातडीने बैठका घ्याव्यात आणि हा ७ई आणि १२ई उतारा लागू करून आदिवासी बांधवांना त्यांचे हक्क मिळवून द्यावेत.

### भूमी अभिलेख विभागातर्फे होणार सर्वेक्षण

ज्या भागांत वनपट्टे वन ब्लॉक क्षेत्रामध्ये देण्यात आले आहेत, त्या ठिकाणी भूमी अभिलेख विभागातर्फे संबंधित जमिनींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर तातडीने स्वतंत्र सातबारा नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ईमध्ये त्यांच्या जमिनीची अधिकृत नोंद केली जाईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

# महापौरांचा कळंबोलीमध्ये पाहणी दौरा

। कळंबोली । प्रतिनिधी ।

सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कळंबोली (प्रभाग८) व रोडपाली परिसरातील अनेक ठिकाणी पाणी साचले. परिणामी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी बुधवारी (दि.८) विविध भागांना प्रत्यक्ष भेट देऊन पूरस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या.

महापौरांनी साचलेल्या पाण्याचा जलद निचरा, नाले व पर्जन्यवाहिन्यांची त्वरित स्वच्छता, पूरग्रस्त भागांतील अडथळे दूर करणे तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही युद्धपातळीवर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पावसामुळे नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी प्रशासनाने सतर्क राहून समन्वयाने काम करण्यावर त्यांनी भर दिला.

यावेळी महापौर नितीन पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले की, सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

# महापुरात अडकलेल्या नागरिकांना दिलासा

## ● श्री बल्लाळेश्वर देवस्थान अन् नगरपंचायततर्फे भोजन

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।



पाली सुधागड सह रायगड जिल्ह्याला धुवाधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. पाली नदीला आलेल्या भीषण पुरामुळे संपूर्ण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. पुराच्या पाण्यामुळे शहराला जोडणारे तीनही बाजूंचे प्रमुख रस्ते बंद झाल्याने शेकडो प्रवासी, नागरिक भाविक व वाहनचालक पाली येथे मध्यभागी अडकून पडले. या सर्वांना श्री बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे मोफत भोजन तर अन् नगरपंचायततर्फे अल्पोपहार देण्यात आला.

अचानक उद्भवलेल्या या संकटामुळे प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या आपत्कालीन परिस्थितीची तात्काळ दखल घेत पाली नगराध्यक्ष पराग मेहता यांनी श्री बल्लाळेश्वर देवस्थान अध्यक्ष जितेंद्र गद्रे व देवस्थान प्रशासनाला सहकार्याची विनंती केली. त्यांच्या आवाहनाला तातडीने प्रतिसाद देत श्री बल्लाळेश्वर देवस्थानच्या अन्नछत्रालयामार्फत अडकून पडलेल्या सर्व नागरिकांना दुपारच्या मोफत भोजनाची दर्जेदार व्यवस्था करण्यात आली. यामुळे शेकडो प्रवाशांची भुकेची समस्या दूर झाली. दुसऱ्या बाजूला, अडकलेल्या प्रवाशांना तात्कालिक दिलासा देण्यासाठी नगराध्यक्ष पराग मेहता आणि उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर यांनी स्वतः प्रत्यक्ष जागेवर जात सर्वांना चहा आणि बिस्किटांचे वाटप केले.

# मिशन विजयचे चार उपचारक होणार सन्मानित

। कोर्लई । प्रतिनिधी ।



आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन आणि आयुष ग्लोबल मेडिकल असोसिएशनने राज्यातील अक्युपंक्चर उपचारकांसाठी भव्य महाअक्युपंक्चर रत्न पुरस्कार-२०२६ सन्मान सोहळा आयोजित केला आहे. यात रायगड जिल्ह्यातील चौघांची निवड झाली आहे. मुरुड तालुक्यातील विजय चंद्रकांत तांबडकर व सिध्देश गजानन बैकर, खोपोलीतील अर्चना विनोद सावंत व पनवेल येथील वंदना पृथ्वीराज यशवंते यांचा यात समावेश आहे.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथे रविवार दि.१९ जुलै रोजी महाअक्युपंक्चर रत्न पुरस्कार-२०२६ सोहळा पार पडणार असून यात राज्यातील अक्युपंक्चर उपचारकांचा गौरव करण्यात येणार आहे.

आधुनिक जीवनशैली जगत असताना अनेक तत्कालिक व जीर्ण रोगांचे प्रमाण वाढले आहे. त्यावर आधुनिक औषधांचा दुष्परिणाम पाहता लोकांचा कल पारंपरिक, पुरक व पर्यायी चिकित्सा पद्धतीकडे वाढला असून राज्यातील अनेक अक्युपंक्चर तज्ञ आपल्या उपचाराने रुग्णांना दिलासा देत आहेत. जे उपचारक कायदेशीर रजिस्ट्रेशन घेऊन ॲक्युपंक्चरचा प्रसार प्रचार करत आहेत, अशा उपचाराकांच्या कार्याचा गौरव आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन आणि आयुष ग्लोबल मेडिकल असोसिएशनच्या वतीने करण्यात येणार आहे.

मिशन विजय अंतर्गत आरोग्य व क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे अक्युपंक्चर, योग निसर्गोपचार उपचारक मास्टर विजय तांबडकर व त्यांचे सहकारी अक्युपंक्चरीस्ट सिध्देश बैकर, वंदना यशवंते, अर्चना सावंत यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# तांबडीत देशी रोपांची लागवड



। चणेरा । प्रतिनिधी ।

आदरणीय डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरणार्थ डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने बुधवारी (दि.८) तांबडी येथील श्री समर्थ बैठक निडी हॉल परिसरात भव्य वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात भुवनेश्वर व तांबडी बैठकीतील तब्बल १६२ श्रीसदस्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. यावेळी श्रमदानातून १६७ वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमात लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाभोवती ग्रीन नेट बसवून त्यांचे संरक्षण करण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनालाही तितकेच महत्त्व देण्यात आले. यावेळी चिंच, जांभूळ, वड, करंज, बेल, पेरू, आंबा आदी विविध प्रकारच्या देशी व फळझाडांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच भविष्यातील पिढ्यांना हिरवाईचा समृद्ध वारसा मिळावा, या उद्देशाने वृक्षांची निवड करण्यात आली होती. वृक्षारोपणादरम्यान श्रीसदस्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयीची जागरूकता, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव प्रकर्षाने दिसून आला. प्रत्येकाने वृक्षारोपणासोबतच त्यांचे संगोपन करण्याचाही निर्धार व्यक्त केला. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित या उपक्रमातून एक वृक्ष, एक जीवन हा महत्त्वपूर्ण संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याची जाणीव करून देत वृक्षसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

## ● डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरणार्थ वृक्षसंवर्धनाचा संकल्प

# इंद्रलोक बस थांब्याचे छप्पर तुटले

## ● तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

। मुंबई । प्रतिनिधी ।



भाईंदर पूर्व येथील अत्यंत वर्दळीच्या आणि मुख्य निवासी परिसर असलेल्या इंद्रलोक येथील बस थांब्याचे छप्पर पूर्णपणे मोडकळीस आले आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या बस थांब्याचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याकडे मीरा-भाईंदर पालिका प्रशासनाने मान्सूनपूर्व कामांत पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे उघड झाले आहे.

सध्या होत असलेली अतिवृष्टी लक्षात घेता, बसची वाट पाहत उभे राहणाऱ्या लहान मुलांचे, महिलांचे आणि ज्येष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल होत असून त्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांची ही मोठी गैरसोय टाळण्यासाठी आणि संभाव्य अपघात रोखण्यासाठी मीरा-भाईंदर पालिका प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

प्रशासनाने प्राधान्य क्रमाने या बस थांब्यावरील तुटलेले एसीपी शीट हटवून त्याजागी पॉलिकार्बो नेट किंवा फायबरसारख्या चांगल्या व टिकाऊ दर्जाचे छप्पर लावून पक्के बांधकाम करावे. तसेच शहरातील इतर सर्व नादुरुस्त थांब्यांचीही तातडीने डागडुजी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक समाजसेवक सिद्धेश पाटील यांनी मीरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाला रीतसर निवेदन दिले आहे. या निवेदनाद्वारे त्यांनी इंद्रलोक परिसरासह शहरातील सर्वच धोकादायक बस थांब्यांचे सर्वेक्षण करून त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## छत्री, शैक्षणिक साहित्याचे वाटप | मोरे प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

# दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ

। महाड । प्रतिनिधी ।



ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्यासाठी आणि पावसाळ्याच्या दिवसांत मुलांची शाळेत येताना होणारी गैरसोय टाळण्यासाठी रायगड जिल्ह्यात एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवण्यात आला.

मोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन मोरे यांच्या अध्यक्षतेखाली आंबिवली बुद्रुक व खुर्द परिसरातील जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांमधील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व छत्र्यांचे मोफत वाटप करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद आंबिवली मराठी शाळा, बौद्धवाडी सोनाली कोंड शाळा, तसेच मूळगाव, बौद्धवाडी आणि सोनाली कोंड येथील अंगणवाड्यांमधील बालकांचा समावेश होता. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मिळालेल्या या थेट मदतीमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये अत्यंत आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाला महाड पंचायत समितीचे सदस्य संदीप खिडबिडे, माजी सरपंच रमेश खिडबिडे, आंबिवली ग्रुप ग्रामपंचायतीच्या सदस्या विमल बाडागले, रावढल गटाचे सदस्य वसंत मोरे, मोहन चोरगे, अपूर्वा महाडिक दाभोलकर, राम तुपट व राजू मोरे प्रामुख्याने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष किसन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक मोरे प्रतिष्ठानचे पदाधिकारी, शाळांचे शिक्षक आणि अंगणवाडी सेविकांनी विशेष परिश्रम घेतले. योग्य नियोजन आणि मान्यवरांच्या हस्ते झालेल्या या थेट वाटपामुळे संपूर्ण आंबिवली परिसरातून मोरे प्रतिष्ठानचे कौतुक केले जात आहे.

> पावसाळ्यात ग्रामीण आणि दुर्गम भागातील एकाही विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये आणि मुलांचा शिक्षणाचा पाया भक्कम व्हावा, हाच प्रतिष्ठानचा प्रामाणिक उद्देश असून यासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांचा असाच सक्रिय लोकसहभाग आवश्यक आहे.
> – किसन मोरे
> (अध्यक्ष, मोरे प्रतिष्ठान)

> **दुर्गम भागातील गरजू विद्यार्थ्यांना वेळेत मदत मिळणे ही आजची गरज आहे. मोरे प्रतिष्ठानने नेहमीच सामाजिक भान ठेवून काम केले आहे. विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहणारा हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद असून, यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाला नक्कीच बळ मिळेल.**
> **– संदीप खिडबिडे (सदस्य, महाड पंचायत समिती)**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जुलै

१) श्री.मोहन कानू वर्तक
वरसोली-रोड, अलिबाग,
दि.१०-७-१९४९

२)श्री.हरिश्चंद्र रामा बामजी
मु.साखर-कोळीवाडा,अलिबाग
दि.१०-७-१९४४

३)श्री.प्रवीण परशुराम मोरे
बालाजीनाका, अलिबाग
दि.१०-७-१९५२

४)श्री.परमानंद नकछेद सिंह
मु.तुडाल, अलिबाग
दि.१०-७-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै. सौ. मालन सुधाकर किल्लेकर., स्मरणार्थ अलिबाग



श्रीमती सुलभा मधुसूदन केळकर, स्मृती प्रित्यर्थ, अलिबाग

# नालासोपाऱ्यात चार घरे कोसळली

**पालघर :** वसई तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशातच नालासोपाऱ्यातील तुळींज परिसरातील साईबाबा नगर येथे गुरुवारी (दि.९) मोठी दुर्घटना घडली. डोंगराच्या उतारावरून वेगाने आलेल्या पाण्याचा प्रवाहामुळे चाळीतील चार घरे अचानक कोसळली. सुदैवाने ही घटना घडत असताना रहिवासी वेळेत बाहेर पडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले.

## निवडक

# पुरात अडकलेल्या नागरिकांना जीवदान



**नागोठणे :** नागोठण्यातील अंबा नदीला आलेल्या पुराने उरूस सर्कल येथे सोमवारी (दि.६) वेढा घातला होता. नागोठण्यात येणाऱ्या व नागोठण्याहून वेलशेत, पेणकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुराचे पाणी मोठ्या प्रमाणात भरले होते. अशावेळी इंजिन बोटसारखी कोणतीही आवश्यक ती अत्याधुनिक साधनसामुग्री जवळ नसताना निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था रायगड (एनव्हिएसएसआर) या संस्थेच्या टीमने आपला जीव धोक्यात घालून व त्यांच्याकडील युक्त्या वापरून उरूस सर्कल येथे अडकलेल्या सर्व नागरिकांची सुखरूप सुटका केली. या सर्व नागरिकांना एनव्हिएसएसआरच्या टीमने रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास सुखरूप पाण्याबाहेर काढले. यावेळी त्यांच्या सोबत नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार प्रकाश हंबीर हे सहकार्य करण्यासाठी उपस्थित होते. एनव्हिएसएसआरच्या रेस्क्यू टीममध्ये जयेश बावकर, अखिल शेलार, निखिल शेलार, विनय पारंगे, रोहित पाटील, स्वयम् पारंगे, प्रसाद जाधव, हार्दिक पारंगे, मंदार निंबाळकर, नीरज बावकर, आयुष ताडकर यांचा समावेश होता.



# मुरुडमध्ये पावसाने घेतली विश्रांती

**कोर्लई :** मुरुडमध्ये दोन दिवसांपासून अधूनमधून पाऊस पडत आहे. चार दिवसाच्या जोरदार पावसानंतर गुरुवारी (दि.९) सकाळी आठ वाजेपर्यंत फक्त १० मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. तर आतापर्यंत १५३४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. ढगाळ वातावरण असले तरी पावसाने विश्रांती घेतली असल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील चार दिवस वाऱ्यासह जोरदार पाऊस पडल्याने गोल बंगला, जुनी बाजारपेठ, तेलवडे, शिघ्रे, मजगाव, खारमजगाव, खारीकवाडा, खार आंबोली, उंडरगाव, काशिद, बारशिव, बोर्ली, मांडला भागात रस्त्यावर तर काही ठिकाणी घरात पाणी शिरले होते. मजगाव रस्त्यावर झाड पडल्याने, खारीकवाडा भागात रस्त्यावर पाणी आल्याने काही काळ वाहतूक विस्कळित झाली होती. त्यामुळे दैनंदिन जनजीवनावर परिणाम दिसून येत होता. आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत तालुका पंचायत समितीमार्फत तालुक्यातील वावे, मजगाव, वेळास्ते, मिठेखार, काकळघर-शिरगांव, राजपूरी, आगरदांडा, सावली, एकदरा येथील रस्त्याची पाहणी करण्यात आली.



# रेल्वेकडून युद्ध पातळीवर काम सुरू

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील मध्य रेल्वेच्या नेरळ-कर्जत भागात रेल्वे मार्गाच्या खालील खडी पावसाच्या पाण्यामुळे वाहून गेली होती. त्यामुळे रेल्वे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. त्यानंतर रेल्वेकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येत असून पाणी अडून राहणाऱ्या मोरीच्या ठिकाणी पाणी जाण्यासाठी मार्ग काढला जात आहे. मध्य रेल्वेवरील नेरळ-कर्जत रेल्वे मार्गावरील रुळाच्या खाली असलेले खडी वाहून गेली होती. पहाटे दोन वाजता त्या भागातून नैसर्गिक नाल्यातून वाहत जाणारे पाणी जास्त प्रवाहामुळे रेल्वे मार्गाने वाहू लागले होते. कर्जत येथून मुंबईकडे जाणारी पहिली लोकल अडीच वाजता नेरळ स्थानकात पोहचल्यानंतर रुळखालील खडी वाहून गेल्याने वाहतूक ठप्प झाली होती. त्यानंतर त्या ठिकाणी मध्यरात्री खडी टाकून वाहतूक पूर्ववत करण्याचा प्रयत्न रेल्वेकडून करण्यात आला. सकाळी मुंबई येथून मध्य रेल्वेचे अधिकारी नेरळ येथे पोहचले. त्यानंतर त्या मोरीमधून रुळा खालून जाणारे पाणी यांना मार्ग करून देण्याची कामे करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी रेल्वे अधिकारी यांच्याकडून पाहणी केली जात असताना काही काळासाठी बदलापूर ते कर्जत या मार्गावरील वाहतूक थांबवून ठेवली होती. त्यानुसार रेल्वेच्या पीडब्लूआय विभागाकडून येथे जेसीबी मशीन आणि कामगार यांच्या मदतीने ही कामे करण्यात येत आहेत.



# तळवली येथे गाय बँकचे वाटप

**खांब :** रोहा तालुक्यातील श्री. क्षेत्र तळवली येथे गाय बँक वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. लायन्स क्लब रोहाचे अध्यक्ष तथा उद्योजक मिनल शहा व लायन्स क्लब रोहा यांच्या माध्यमातून या गाय बँकचे वाटप ग्रामस्थांना करण्यात आले. ग्रामस्थांना बचतीची सवय लागावी तसेच गाय बँक देण्यामागचा उद्देश याबाबत मिलन शहा यांनी माहिती सांगितली. ते म्हणाले, आमचे वडील आणि तळवली गाव यांचे असणारे ऋणानुबंधनाचे नाते भविष्यातही कायमच राहणार असून वडीलांनी जपलेली सहकार्याची भावना भविष्यातही कोणत्याही परिस्थितीत कायमच जपली जाईल, असे आश्वासन दिले. यावेळी सरपंच रविंद्र मरवडे, रायगडभूषण डॉ. मारूती महाराज कोलाटकर, माजी सरपंच वसंत मरवडे, माजी उपसरपंच रघुनाथ कोस्तेकर, गजानन बामणे, मदन महाराज कोलाटकर, रामचंद्र बामणे, खेळू मरवडे, पत्रकार श्याम लोखंडे, नंदू मरवडे, सुभाष बामणे,अनंत मरवडे, देवजी मरवडे, सुरेश मरवडे, ज्ञानेश्वर मरवडे, शशिकांत मरवडे, रमेश कोलाटकर, पंढरीनाथ बामणे, सुनील मरवडे, परशुराम बामणे, जनार्दन नागावकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# माणगाव शहराला महापुराचा महाविळखा

| माणगाव | सलीम शेख |

निसर्गाच्या अविरत प्रकोपाने माणगाव तालुका अक्षरशः पुराच्या महाविळख्यात सापडला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे काळ आणि गोद नदीने रौद्र रूप धारण केले असून, शहरासह ग्रामीण भागात भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. येथील रस्ते जलमय झाले असून, शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत पिके वाहून गेली आहेत. तसेच, हजारो नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळित झाले आहे.

तालुक्यातील सर्व धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली असून, प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. या आठवड्यात तालुक्यात सुमारे १०२ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केल्याने प्रशासनाने दोन दिवस शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली होती.

पुढील काही दिवसही मुसळधार पावसाचा इशारा



- अनेक गावांचा संपर्क तुटला
- संकटातही माणगावकरांनी जपली माणुसकी

असल्याने नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, भिरा धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने नदीच्या पाण्याच्या प्रवाहात प्रचंड वाढ झाली.

महामार्गावरील वाहतूक सुरू असली, तरी अनेक अंतर्गत रस्ते बंद राहिल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सलग ४८ तास अनेक भागांतील जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले होते. पूराचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

भातशेतीसह विविध पिके पाण्याखाली गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने अनेक भाग अंधारात बुडाले, तर पाणीपुरवठाही अनियमित झाला. बाजारपेठ बंद राहिल्याने व्यापारी आणि छोट्या व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

शहरातील खांदाड, सिद्धी नगर, भादाव, बामणोली रोड, रेल्वे स्थानक, कचेरी रोड या परिसरात तब्बल आठ दिवस पुराचे पाणी साचून राहिल्याने नागरिकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागला. अनेक कुटुंबांना घर सोडून सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला. संसारोपयोगी साहित्य, धान्य, फर्निचर, विद्युत उपकरणे आणि घरातील मौल्यवान वस्तूंचे मोठे नुकसान झाले. अनेकांच्या आयुष्यभराच्या कष्टावर एका रात्रीत पाणी फिरले.

पुराच्या पाण्यामुळे बामणोली, मांगवली, निळगुण, रीळे, पाचोळे, नाणोरे यांसह अनेक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला. अनेक ठिकाणी रस्ते आणि पूल पाण्याखाली गेल्याने गावांमध्ये अन्नधान्य, दूध, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा विस्कळित झाला. सध्या पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याने पाण्याची पातळी हळूहळू ओसरत असली तरी जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी अजून काही दिवस लागणार आहेत.

मात्र, या संपूर्ण संकटात माणगावकरांनी माणुसकीची उज्ज्वल परंपरा जिवंत ठेवली. पुरात अडकलेल्या प्रवाशांना सुरक्षित स्थळी पोहोचविणे, अन्न-पाणी उपलब्ध करून देणे, वृद्ध, महिला आणि लहान मुलांना मदत करणे, रात्रभर बचावकार्य करणे अशा अनेक प्रकारे नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, पोलीस, महसूल प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा खंबीरपणे उभी राहिली. संकट कितीही मोठे असले तरी माणुसकी त्याहून मोठी असते, हे माणगावने पुन्हा एकदा सिद्ध केले.

## नागरिकांसाठी प्रशासनाचे आवाहन

माणगावकरांनी सतर्क राहावे, एकमेकांना मदतीचा हात द्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. तसेच, नदी, नाले आणि पूरग्रस्त भागाजवळ जाऊ नका. विनाकारण घराबाहेर पडणे टाळा. अफवांवर विश्वास ठेवू नका. प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करा, अशा सुचना देखील करण्यात आल्या आहेत. तसेच, आपत्कालीन मदतीसाठी पोलीस १००, आपत्ती व्यवस्थापन ११२, राष्ट्रीय आपत्तीव्यवस्थापन ९७११०७७३७२ आणि रुग्णवाहिका १०८ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन देखील प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



## पनवेल शहर गुडघाभर पाण्यात

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

बुधवारी पहाटेपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने पनवेल शहरासह तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले होते. अवघ्या काही तासांच्या पावसामुळे शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले होते. प्रमुख रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली, तर वाहनचालक आणि पादचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली होती.

पनवेल शहरातील उरण नाका परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता.

सततच्या पावसामुळे कृष्णाळे तलाव आणि नवीन पनवेलमधील आदई तलाव ओसंडून वाहू लागल्याने त्याचे पाणी रस्त्यावर आले होते. परिणामी परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. तर काही नागरिकांना पाण्यातून वाट काढत घर आणि कामाच्या ठिकाणी पोहोचावे लागले.

## कुत्र्याला जीवनदान

पाली/बेणसे : अंबा नदी पुलाखाली पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या एका कुत्र्याला प्राणीमित्र अमित निंबाळकर यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता धाडसाने पाण्यात उतरून सुरक्षित बाहेर काढत त्याला जीवनदान दिले. अंबा नदीच्या पुलाखालील वेगवान पाण्याच्या प्रवाहात एक कुत्रा अडकला होता. त्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचे लक्षात येताच प्राणीमित्र अमित निंबाळकर यांनी क्षणाचाही विलंब न करता नदीत उडी घेतली. मोठ्या धाडसाने आणि प्रसंगावधान राखत त्यांनी कुत्र्यापर्यंत पोहोचून त्याची सुखरूप सुटका केली.

## शैलेश पवार यांची प्रेरणादायी भरारी

| माणगाव | प्रतिनिधी |



माणगाव येथील राजिप अधिकारी गोपाळराव (आबा) पवार यांचे चिरंजीव शैलेश पवार यांनी माणगाव व महाड येथे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी सुमारे १० वर्षे नोकरीचा अनुभव घेतला आणि २०१० साली स्वतःचा उद्योग उभारण्याचे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात साकार केले. अथक परिश्रम, संयम, चिकाटी आणि स्वतःचे ज्ञान यांच्या बळावर त्यांनी पुण्यात सिंहगड रोडजवळील नांदेड सिटी परिसरात थर्मोटेक इंडस्ट्रीज प्रा. लि. ही उत्पादन क्षेत्रातील कंपनी स्थापन केली. सध्या ते या कंपनीचे संस्थापक व कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. १०० हून अधिक जणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. गेल्या १५ वर्षांपासून कंपनी टाटा मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा, फोर्स मोटर्स, हनीवेल, श्नायडर इलेक्ट्रिक, पॉलीकॅब, बजाज इलेक्ट्रिकल्स यांसारख्या नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांना असेंब्ली पार्ट्सचा सातत्याने पुरवठा करत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक यंत्रसामग्री, रोबोटिक्स आणि ऑटोमेशनचा अवलंब करून कंपनीने उत्पादन क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून, माणगावकरांसाठी त्यांची हि झेप भूषणावह आहे.

## मोरी खचल्यामुळे अपघाताचा धोका

| पाताळगंगा | प्रतिनिधी |



खालापूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सावरोली-खारपाडा मार्गाची दुरवस्था झाली आहे. त्यातच आंबिवली येथील नव्या पुलाच्या पुढे इसांबा येथील मोरी खचल्यामुळे साईट पट्टीच्या भाग खचला आहे. रस्त्याखालची माती वाहून गेल्यामुळे या ठिकाणी मोठा खड्डा पडल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसमोर अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

सावरोली-खारपाडा हा परिसरातील महत्त्वाचा संपर्क मार्ग असून या रस्त्यावरून दररोज लहान-मोठी वाहने, दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, कामगार तसेच ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र, रस्ता खचल्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा मुसळधार पावसात खड्डा स्पष्टपणे दिसत नसल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सततच्या पावसामुळे रस्त्याखालची माती वाहून गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित ठिकाणी कोणत्याही प्रकारची इशारा फलक किंवा सुरक्षेची व्यवस्था नसल्याने वाहनचालकांना अचानक खड्ड्याचा सामना करावा लागत आहे.

## हीट अँड रन प्रकरणात चालकाला अटक

**पनवेल** : हीट ॲण्ड रन प्रकरणातील तळोदा पाचनंद येथील कारचालक अरफात साबीर पटेल (२२) याला तळोजा पोलिसांनी अटक केली आहे. अरफात यांनी इलेक्ट्रिक चारचाकी गाडी भरधाव वेगाने चालवून दि.७ जुलै रोजी स्कुटी, टेम्पो आणि मोटरसायकलला धडक दिली होती. या धडकेत नदीम खान याचा जागीच मृत्यू झाला. तर, इतर पाच जण जखमी झाले होते. त्यानंतर घटनास्थळावरून अरफात साबीर पटेल पळून गेला होता. मात्र, तळोजा पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

## रोहेकरांचे जनजीवन हळूहळू पूर्वपदावर

| धाटाव | प्रतिनिधी |

सततच्या कोसळधारांमुळे सर्वत्र महापुराचा प्रलय असताना आणि काहींच्या घरातून गुडघाभर पाण्यापासून सुटका मिळाल्याने अनेकांनी निःश्वास सोडला. गेल्या आठवड्याभरापासून आभाळात दाटून आलेल्या काळ्याकुट्ट ढगांमुळे संपूर्ण तालुक्यात अंधारून आले होते. सततच्या पावसाने कुंडलिका नदीच्या पाणीपातळीत कमालीची वाढ झाली होती, त्यामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. सततच्या कोसळणाऱ्या सरींमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते. बाजारपेठेतील उलाढाल मंदावली होती, तर ग्रामीण भागातील, औद्योगिक वसाहतीतील आणि काही ठिकाणी मुख्य रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. सगळीकडे पाणीच पाणी असताना स्वतःला जणू घरातच कोंडून घेतलेल्या नागरिकांना पावसाने उसंत घेतल्यामुळे सूर्यनारायणाचे दर्शन अखेर घडले. मोकळ्या झालेल्या आकाशातील ढगांतून पडलेली कोवळी उन्हाची किरणे पाहून तालुका आणि शहरवासीयांनी सुटकेचा मोठा श्वास टाकला. गेली पाच दिवसांपासून गायब झालेल्या सूर्यनारायणाच्या दर्शनाने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

## सिडकोची धडक कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागाने खारघर आणि कळंबोली नोड परिसरात अनधिकृत बांधकामांविरोधात धडक निष्कासन मोहीम राबविली. या कारवाईत खारघर सेक्टर ३५जी येथील भूखंड क्रमांक १३ वरील अनधिकृत खेळाचे टर्फ आणि नर्सरी शेड, तसेच कळंबोली नोडमधीलरोडपाली येथील सेक्टर १० ई, भूखंड क्रमांक १ वरील अनधिकृत गॅरेज आणि जुन्या रिक्षांचे पार्किंग शेड जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आले. संबंधित बांधकामे सिडकोची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता, तसेच प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून उभारण्यात आली होती. त्यामुळे नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्यात आल्याचे सिडको प्रशासनाने स्पष्ट केले. ही मोहीम सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. खारघर व कळंबोली नोडचे नियंत्रक श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी, कर्मचारी, सिडको पोलीस पथक, बोर्डाचे सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी संयुक्तरीत्या ही कारवाई पूर्ण केली.

## पुलावरील रेलिंग गेली वाहून

| खोपोली | प्रतिनिधी |



जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका खालापूर तालुक्यातील सावरोली येथील पाताळगंगा नदीवरील पुलाला बसला आहे. नदीच्या प्रचंड प्रवाहामुळे पुलावरील सुरक्षा रेलिंग वाहून गेल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगत असलेला हा पूल खालापूर एमआयडीसी परिसरासाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. या मार्गावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने तसेच औद्योगिक वाहतूक सुरू असते. रेलिंग तुटल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दरम्यान, पावसामुळे एमआयडीसी परिसरात अनेक ठिकाणी पाणी साचल्याने कामगारांची मोठी गैरसोय झाली.

या घटनेची माहिती मिळताच संबंधित प्रशासनाने पुलावर नवीन सुरक्षा रेलिंग बसविण्याचे काम तातडीने हाती घेतले असून, युद्धपातळीवर दुरुस्ती सुरू आहे. मात्र, पावसाचा जोर कायम असल्याने नागरिकांनी या मार्गावरून प्रवास करताना विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी पुलाची कायमस्वरूपी दुरुस्ती करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

**माणगाव** : ॲड. राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त माणगावात वृक्षारोपण सप्ताह कार्यक्रम घेण्यात आला. तसेच दि.७ जुलै रोजी मातोश्री गंगुबाई शिंदे सिबीएससी स्कुल माणगाव याठिकाणी केईएम रुग्णालय परेल-मुंबई रक्तपेढीचे डॉ. प्रकाश सावंत व त्यांचे सहकारी तसेच जनकल्याण रक्तपेढी महाड यांच्या सौजन्याने रक्तदान शिबीर संपन्न झाले. तसेच, यावेळी संजय आण्णा साबळे संकुल माणगाव याठिकाणी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजन व स्विमिंगपुलचे उद्घाटन करण्यात आले.

डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी पुरस्कार सुरू | पहिल्या पुरस्काराचे मानकरी डॉ. कल्याण गंगवाल

## डॉ. संचेती मेडी रत्न पुरस्कारांनी होणार गौरव

| महाड | उदय सावंत |

संचेती हॉस्पिटलतर्फे डॉ. के. एच. संचेती मेडी रत्न पुरस्काराची स्थापना करण्यात आली आहे. हा पुरस्कार मेडीजैन कम्युनिटीच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. वैद्यकीय सेवेच्या पलीकडे जाऊन समाजावर अर्थपूर्ण व दीर्घकालीन प्रभाव निर्माण करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.



नुकतेच झालेल्या राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त याअंतर्गत पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत पहिला पुरस्कार फिजिशियन डॉ. कल्याण मोतीलालजी गंगवाल यांना प्रदान करण्यात आला. डॉ. कल्याण गंगवाल हे प्रतिष्ठित वैद्यकीय तज्ज्ञ असून कॅरियम हॉस्पिटल, पुना हॉस्पिटल आणि ससून हॉस्पिटल यांसारख्या नामांकित संस्थांशी त्यांची कारकीर्द जोडलेली आहे. या पुरस्कार सोहळ्याला दर्शन आय केअर सेंटरचे संस्थापक डॉ. जिग्नेश तसवाला, संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे अध्यक्ष डॉ. पराग के. संचेती, डॉ. पराग जैन, डॉ.ज्योती संघवी, डॉ. सोनल पालरेचा, डॉ. आरती भटेवरा, रूपल संचेती, अर्चना संचेती, यशवंत शिवण्णा तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे अध्यक्ष डॉ. पराग संचेती म्हणाले की, माझ्या वडिलांनी संचेती हॉस्पिटलची स्थापना ही ''रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा'' या एका साध्या पण मोलाच्या विचारावर केली. त्यांनी आम्हाला नेहमीच हे शिकवले की, डॉक्टरांचे कर्तव्य हे केवळ रुग्णालयाच्या दारापर्यंत मर्यादित नसते. आजही ते रूग्णालयात येतात तेव्हा त्यांचे मोलाचे मार्गदर्शन सर्वांना करत असतात. ज्यांचे कार्य केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणारे आहे, अशा डॉक्टरांचा डॉ. के. एच. संचेती मेडी रत्न पुरस्काराने गौरव केला जातो. डॉ. कल्याण गंगवाल यांनी आपल्या कार्यातून उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे.

## निवडक



### वनवासी आश्रमातर्फे शिधा वाटप

**माणगाव** : महाड तालुक्यात (दि.४) जुलै रोजी झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे वरंध येथील आदिवासी वाडीवर मोठी दरड कोसळून भीषण दुर्घटना घडली. या घटनेत अनेक घरे जमीनदोस्त झाली असून, संपूर्ण वाडीच धोक्याच्या छायेत आली आहे. या वाडीतील सुमारे ७५ हून अधिक आदिवासी कुटुंबांना आपली घरे सोडून सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे लागले. दरडीच्या भीतीमुळे सर्व कुटुंबांनी जवळपास दीड किलोमीटर अंतरावरील एका पोल्ट्री फार्मच्या शेडमध्ये आश्रय घेतला आहे. गेल्या दोन दिवसांपासून लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अत्यंत मर्यादित सुविधांमध्ये राहत असून त्यांच्यासमोर अन्न, कपडे, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंची मोठी समस्या निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची माहिती महाड तालुक्यातील वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा व प्रांत पदाधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर वनवासी कल्याण आश्रमाचे प्रांत संघटन मंत्री प्रदीप पाटील यांनी तातडीने जिल्हा कार्यकर्त्यांशी संपर्क साधून मदतकार्य सुरू करण्याच्या सूचना दिल्या. या अनुषंगाने मंगळवारी (दि.७) वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष वरंध येथील आदिवासी वाडीला भेट देत सर्व ७५ कुटुंबांना तांदूळ, डाळ, तेल, साखर तसेच अन्य जीवनावश्यक शिधा साहित्याचे वाटप केले.

### आदिवासी व्यक्ती बाजारपेठेतून हरवली



**नेरळ** : कर्जत तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने जोर धरला असून, या पार्श्वभूमीवर साागाचीवाडी येथील पांडू निरगुडे हे आदिवासी व्यक्ती बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी पांडू हे नेहमीप्रमाणे नेरळ बाजारपेठेत काही कामानिमित्त गेले होते. त्यानंतर दुपारच्या सुमारास ते नेरळ येथून आपल्या गावी निघाले असल्याची माहिती मिळाली. मात्र, त्यानंतर ते घरी पोहोचलेच नाहीत. रात्री उशिरापर्यंत वाट पाहूनही त्यांचा काहीच थांगपत्ता न लागल्याने ग्रामस्थांनी तत्काळ शोधमोहीम सुरू केली. गेल्या चार दिवसांपासून शोध घेत आहेत. मात्र, अद्याप त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. दरम्यान, कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाले ओसंडून वाहत असून, अनेक ठिकाणी पाण्याचा वेग प्रचंड वाढलेला आहे. त्यामुळे शोधकार्य करताना अडचणी निर्माण होत आहेत. पांडू निरगुडे यांच्याकडे मोबाईल फोन नसल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधणे शक्य होत नसून, शोधकार्य अधिकच कठीण झाले आहे. या घटनेमुळे साागाचीवाडी व परिसरात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



### प्लास्टिकच्या बाटल्यांचा फटका

**खांदा कॉलनी** : पनवेल भाजी मार्केट परिसरातील सरोवराचे पाणीही रस्त्यावर वाहू लागल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या परिसरातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेकण्यात आलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचरा कारणीभूत असल्याचे स्वच्छता मोहिमेदरम्यान स्पष्ट झाले. पाणी पिऊन झाल्यानंतर अनेक नागरिक प्लास्टिकच्या बाटल्या थेट नाल्यांमध्ये फेकत असल्याने पाण्याचा प्रवाह अडथळला जात आहे. पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्नाळा सर्कल परिसरातील नाल्यांची तातडीने साफसफाई करण्यात आली. यावेळी नाल्यातून हजारो प्लास्टिकच्या बाटल्या आणि मोठ्या प्रमाणात कचरा बाहेर काढण्यात आला. पालिकेकडून सातत्याने स्वच्छता व जनजागृती मोहीम राबविली जात असली तरी काही नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे शहरासमोर गंभीर समस्या निर्माण होत आहेत. नाले तुंबल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचत आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण होते.

### सुरक्षा रक्षकाच्या नियुक्तीची मागणी

**पनवेल** : महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमी आणि दफनभूमींवर तातडीने सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने पनवेल महापालिका प्रशासनाला अंतिम स्मरणपत्र दिले आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. युनियनच्या निवेदनानुसार, पनवेल महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील एकूण ७८ स्मशानभूमी व दफनभूमींवर सुरक्षा रक्षक नसल्याने सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, धार्मिक स्थळांची सुरक्षितता तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. या ठिकाणी समाजविघातक कृत्ये होण्याची शक्यता असून, नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाण्याचा धोका असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी सादर करण्यात आलेल्या निवेदनांमध्येही हा मुद्दा मांडण्यात आला होता. तसेच, स्थानिक वृत्तपत्रांमधूनही या विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- अलिबागमध्ये, फार्म हाऊस सांभाळण्यासाठी व जेवणाकरता येणारी स्त्री अथवा पुरुष व्यक्ती पाहिजे. संपर्क : ९४२३६९०२९५
- Vacancy for Furniture Workshop office Education-Graduation. Experience-2 years, Location- Bamansure, chondhi Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# प्रगतशील शेतकरी प्रवीण दळवी यांचा सन्मान

**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील भाल गावचे रहिवासी प्रवीण दळवी यांना प्रगतशील शेतकरी पुरस्कार आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सुरुवातीला शेती पारंपरिक पद्धतीने केली जात असल्याने उत्पादनापेक्षा खर्चच जास्त होत असे. प्रवीण यांना लहानपणापासूनच शेतीची आवड होती, त्यामुळे ते आई-वडिलांना शेतीच्या कामात मदत करत असत. मोठे झाल्यावर त्यांनी स्वतःहून भाजीपाला, फळझाडे आणि फुलझाडांची लागवड करण्यास सुरुवात केली.

ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता त्यांनी आपल्या शेतात आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक पद्धती आणि नाविन्यपूर्ण नियोजनाचा वापर करून सेंद्रिय शेतीचा मार्ग स्वीकारला. काळाची गरज ओळखून त्यांनी आपल्या शेतात हापूस आंबा, लाल जाम, फणस, बारामाही शेवगा, अंजीर आणि लिंबू अशा विविध फळझाडांची यशस्वी लागवड केली आहे. त्यांच्या शेतातील ही समृद्धी पाहून पाहणाऱ्यांचे मन थक्क होते.

या यशानंतर प्रवीण दळवी यांनी शासनाने शेती मित्र ही संकल्पना लवकरात लवकर राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या उपक्रमात आपण सहभागी होऊन आपल्या शेतकरी बांधवांसाठी सदैव तत्पर राहून काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| सौ. सुप्रिया रविंद्र कुराडे. | १८/६/अ/१ | १८१ चौ.मी. | १८-१० |
| | ९८/६ | २३९ चौ.मी. | २३-९० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०९/०७/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत,जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अतुल शरद कुंटे, रा. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांस सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | २३५३ | ०-१२-७० पो.ख.०-०१-५० एकूण ०-१४-२० | ६-०६ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ९-०७-२०२६.

सही/-
**ॲड. आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## उपविभागीय अधिकारी, माणगाव उपविभाग, माणगाव, जि. रायगड यांच्या न्यायालयातील कामकाज

कचेरी रोड, माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड
दूरध्वनी क्र. ०२१४०-२६३१४१ Email - sdomangaon@gmail.com

**सुनावणीची जाहीर नोटीस** आरटीएस अपील/संकिर्ण-६२/२०२५

१) श्री. हरिश्चंद्र शंकर चाळेकर
रा. विळे, ता. माणगांव, जि. रायगड सध्या रा.पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे
२) श्रीमती लिलाबाई दत्तात्रय धोत्रे
रा. पुर्व कुडली, ता. रोहा, जि. रायगड
३) श्री. नितीन वसंत राहाटे
रा. रुम नं. ८६, शिवशक्तीनगर, रोड नं. १६,पाईप लाईनजवळ, वागळे इस्टेट, ठाणे ४००६०४
४) श्रीमती वर्षता दिलीप राऊत
५) श्री. रुपेश वसंत राहाटे
क्र. ४ व ५ रा. शिवाजी चाळ, रुम नं. १२, फुलगल्ली, रोड नं. १६, किसन नगर, वागळे इस्टेट, ठाणे ४००६०४
६) श्रीमती निकीता रोहन गोडांबे
७) श्रीमती वैशाली मंगेश चाळेकर — अपिलार्थी
८) श्री. वेदांत मंगेश चाळेकर
क्र. ६ ते ८ रा. गणेश नगर, पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे
९) श्रीमती वनिता सिताराम जाधव
रा. स्वप्ननगरीजवळ, उदयनगर, बी. आर. रोड, मुलुंड पश्चिम
१०) श्रीमती सुलोचना रामभाऊ महाडीक
रा. जावटे, ता. माणगांव, जि. रायगड
११) श्रीमती मुक्ता चंद्रकांत धोत्रे
रा. ७०१, कॅम्प न्यु इंग्लिश स्कुलजवळ, पिरंगुट, पुणे ४१२१०८ क्र. १ स्वत: करीता व क्र. २ ते १० तर्फे अखत्यारी

**विरुद्ध**

१) श्री. विजय नामदेव दळवी
२) श्रीमती रश्मी राजेंद्र रटाटे
३) श्री. संजय दशरथ पावसकर
४) श्री. योगेश दशरथ पावसकर
५) श्रीमती सुप्रिया सुरेश मंचेकर
६) श्रीमती विणा विनोद सोनावणे
७) श्रीमती विपुला अनिल सपकाळ — उत्तरार्थी
८) श्रीमती सारा नदीम चिलवान
९) श्री. प्रसाद विनायक राऊत
१०) श्रीमती मनस्वी महेश सावंत
११) श्रीमती नम्रता विकास दळवी
१२) श्रीमती प्रियंका विकास दळवी क्र.१ ते १२ रा. विळे, ता.माणगांव, जि.रायगड
१३) श्रीमती दिपीका दिलीप बांदल
१४) श्री. दर्शन दिलीप बांदल
१५) श्री. देवेंद्र दिलीप बांदल
क्र. १३ ते १५ रा. दत्तवाडी, पुणे
१६) श्रीमती इंदुबाई दत्तात्रय नगीने रा. राजगुरु नगर, खेड
१७) श्री.चंद्रकांत पोपट धोत्रे
रा. पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे
१८) श्री. दिगंबर मारुती राऊत — उत्तरार्थी
१९) श्री. यशवंत मारुती राऊत
क्र. १८ व १९ रा. गुरव आळी, पेण, ता. पेण, जि. रायगड

अपिलार्थी, श्री. हरिश्चंद्र शंकर चाळेकर व इतर रा. विळे, ता. माणगांव, जि. रायगड यांनी मौजे विळे, ता. माणगांव, जि. रायगड येथील शेतजमीन स.नं./गट नं. ५/१६ क्षेत्र ०.११.०० हे. आर., ५/७ क्षेत्र ०.५२.०० हे. आर. २/१ क्षेत्र ०.३५.५० हे. आर., २/३ क्षेत्र ०.२४.५० हे. आर. या जमिनींच्या संदर्भात घेण्यांत आलेली फेरफार नोंद क्र. १६७५, २६६६, २२०१ व २९६८ आव्हानित करण्यासाठी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील सादर केले आहे. उत्तरार्थी यांनी नोटीसची बजावणी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे करण्याचा प्रयत्न केला असता, बजावणी होऊ शकलेली नाही. यास्तव सदर जाहीर नोटीसीद्वारे सर्व संबोधतांना कळविण्यात येते की, उक्त अपील प्रकरणाची सुनावणी या कार्यालयात दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. त्यावेळी आपण स्वतः किंवा योग्यरीत्या प्राधिकृत व्यक्ती किंवा विधीज्ञ यांचे माध्यमातुन आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. वरीलप्रमाणे आपण हजर राहुन बाजू मांडण्यात कसूर केल्यास प्रस्तुत अपिलाची सुनावणी एकतर्फी पुर्ण करून कागदपत्रांच्या गुणवत्तेवर आधारीत न्यायनिर्णय पारित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: माणगांव
दिनांक :- ०३/०७/२०२६

सही/-
**(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी**
**माणगांव उपविभाग माणगांव**

दिनांक : ०९/०७/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक परशुराम रामचंद्र घडशी यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा /गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वांदेली ता.मुरुड | १५१ | क्षेत्र ०-०३-०० पो.ख. ०-००-८० एकूण क्षेत्र ०-०३-८० | ०.१९ |
| | १५२ | क्षेत्र ०-०२-१० पो.ख. ०-००-२० एकूण क्षेत्र ०-०२-३० | ०.२५ |
| | १५३ | क्षेत्र ०-४३-२० पो.ख. ०-०१-३० एकूण क्षेत्र ०-४४-५० | ५.७० |

दिनांक : ०९/०७/२०२६

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता:- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९७६७०१०९०२

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**अधिसूचना क्र. 05, 06, 07, 08, 09, 10-2026-2027**

क्षेत्रिय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) यांच्याकडून कोंकण रेल्वेवरील रत्नागिरी रेल्वे स्थानकाच्या नव्याने विकसित फसाड क्षेत्रामध्ये मोबाईल ॲक्सेसरीज दुकान, मिल्क पार्लर, पर्यटन बूथ/काउंटर, सलून व कॉस्मेटिक पार्लर, ऑटोमॅटिक व्हेंडिंग मशीन, केक दुकान यांचे 9 वर्षांच्या कालावधीसाठी वाटप करण्याकरिता पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा (दोन पाकीट प्रणाली) द्वारे खुल्या निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **निविदा सूचना क्र.: केआर/सीओएमएल/डीसीएम/ फूड स्टॉल-आरएन, दिनांक: 10.07.2026. स्थान**: रत्नागिरी रेल्वे स्थानकाच्या नव्याने विकसित फसाड क्षेत्राच्या प्रवेशद्वारावर. **निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 10.08.2026 रोजी 11:00 वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याची दिनांक व वेळ**: 10.08.2026 रोजी 11:30 वा. निविदा दस्तऐवज **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर निविदाकाराची नोंदणी केल्यानंतर प्राप्त करता येतील.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्यामार्फत खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे.

**क्र.: 1. कामाचे नाव**: एसएसई/कणकवली विभागांतर्गत डीप स्क्रीनिंग, शॅलो स्क्रीनिंग, स्लीपर बदलणे, ट्रॅकचे डीस्ट्रेसिंग इत्यादी. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-18, दिनांक 10.07.2026. अंदाजित किंमत**: रु. 184,71,394/-. **ईएमडी**: रु. 3,69,400/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 05.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

**क्र.: 2. कामाचे नाव**: वरिष्ठ डीईएन/रत्नागिरी विभागांतर्गत चिपळूण, भोके व नांदगाव स्टेशन यार्डमध्ये थ्रू टर्नआउट बदलणे. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-13ए (दुसरा कॉल), दिनांक 10.07.2026. अंदाजित किंमत**: रु. 74,30,130/-. **ईएमडी**: रु. 1,48,600/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 05.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी, प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी येथे संपर्क साधावा. (वेबसाइट: **https://www.ireps.gov.in**)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - पिंपळपाडा, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील श्री. चंद्रकांत कमलाकर पिंगळे, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक पल्लवी श्रीकांत आयंगार यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पिंपळपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| पिंपळपाडा | ५२/८ | ०.२४.०० | ०.२० |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे. तसेच सदरील मिळकतीमध्ये पल्लवी श्रीकांत आयंगार आणि सहहिस्सेदार त्यांचे वडील स्व. हिम्मतलाल अमृतलाल देसाई अशा दोघांचे नावे आहेत.

पल्लवी श्रीकांत आयंगार यांचे वडील दिनांक १३/०५/२०२० रोजी निधन पावलेले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर सदर मिळकतीमध्ये त्या स्वतः त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार आहे. तसेच त्यांचेशिवाय इतर कोणीही वारस नाही असे त्या स्वतःहून जाहीर व कबूल करतात. सदर या जाहीर नोटीस करीता त्यांनी NOC दिलेली आहे. व बयाणा सुद्धा घेतला आहे

सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. १०/०७/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२ / ८४४६७२४९८८

## सार्वजनिक सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, मी, श्रीमती प्रमिला हरिश्चंद्र पाटील मेसर्स हरी कन्स्ट्रक्शन (कार्यालय: नारायण स्मृती, दुसरा मजला, भाईंदर पूर्व, ठाणे, महाराष्ट्र ४०११०५) या भागीदारी संस्थेची भागीदार आणि सर्व भागीदारांची अधिकृत प्रतिनिधी यांनी श्री. प्रल्हाद यशवंत पाटील यांना आमचे कायदेशीर प्रतिनिधी (ॲटर्नी) म्हणून नियुक्त करण्यासाठी २० मार्च २०२४ रोजी दिलेले 'जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी' (सर्वसाधारण मुखत्यारपत्र) तात्काळ प्रभावाने रद्द केले आहे.

त्यानुसार, २० मार्च २०२४ रोजीचे सदर 'जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी पूर्णपणे रद्द करण्यात आले असून, रद्द केल्याच्या तारखेपासून ते निरर्थक, शून्यवत (null and void) आणि अंमलात नसलेले मानले जाईल.

सर्वसामान्य जनता, सर्व सरकारी आणि निमसरकारी प्राधिकरणे, बँका, वित्तीय संस्था, कंपन्या, विकासक (डेव्हलपर्स), सहकारी गृहनिर्माण संस्था, निबंधक, दुय्यम निबंधक आणि इतर सर्व व्यक्तींना याद्वारे सूचित व सावध करण्यात येत आहे की, त्यांनी कोणत्याही कारणासाठी सदर जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी' वर अवलंबून राहू नये किंवा त्याआधारे कोणतीही कृती करू नये. सदर रद्द केलेल्या 'जनरल पॉवर ऑफ ॲटर्नीच्या आधारे व्यवहार करणारी किंवा कृती करणारी कोणतीही व्यक्ती ती कृती पूर्णपणे स्वतःच्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांची जबाबदारी स्वीकारून करेल, आणि रद्द केल्याच्या तारखेनंतर सदर प्रतिनिधीने (ॲटर्नीने) केलेल्या किंवा केल्याचा दावा केलेल्या कोणत्याही कृतीसाठी, व्यवहारासाठी, विधानासाठी किंवा वचनासाठी आम्ही जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही.

दिनांक: ०९ जुलै, २०२६

स्थळ: पेण
सही/-
श्रीमती प्रमिला हरिश्चंद्र पाटील

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
कार्यालय परमार प्लाझा, गाळा क्र.१६,
तालुका-पेण, जिल्हा - रायगड


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर ६२/३, एकूण क्षेत्र ०-६०-८० हे.आर., आकार ९.७४ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-८० हे. आर. ही भातशेती व गवत मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्ताराम उर्फ दत्तात्रेय शांताराम वर्तक रा. मु. भायमळा, पो.कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/०७/२०२६

**(ॲड. संजय द.म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे एकुण ०हे.-४२आर. ००चौ.मी. क्षेत्रापैकी १. श्रीमती विशाखा सचिन पाटील, २. जीत सचिन पाटील आणि ३. मंजुळा उर्फ प्रगती प्रेमनाथ पाटील यांचे सामाईक हिस्स्याची ०हे. २०आर००चौ.मी. क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे -मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| विशाखा सचिन पाटील<br>जीत सचिन पाटील<br>मंजुळा उर्फ प्रगती प्रेमनाथ पाटील<br>त्रिभुवन त्रेंबक म्हात्रे<br>निता नारायण म्हात्रे<br>प्रमोदीनी गणेश डावून<br>मनोज त्रेंबक म्हात्रे<br>रसिका रोशन जुईकर<br>रेश्मा रमेश पाटील<br>विकास त्रेंबक म्हात्रे | ३०२ | | ०-४२.००<br>पैकी ०-२०.०० | ४.०६ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्झिशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १. श्रीमती विशाखा सचिन पाटील, २. जीत सचिन पाटील आणि ३. मंजुळा उर्फ प्रगती प्रेमनाथ पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १०/०७/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं.९३२५००४००८.

## जाहीर नोटीस
**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

कै. अरुण नामदेव पाटील (म.त.वा.)
छाया अरुण पाटील .अपिलार्थी

विरुद्ध

कुसुम दामोदर म्हात्रे ....उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसमध्ये वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात विलंब माफी अर्ज क्र. ११४/२०२५ दाखल केले आहे.

| गावाचे नांव | जु.स.नं. | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| मौजे शहापुर, ता.अलिबाग | ५६३/३ | ५६३/३/अ | ०-५२-४० | ६.८१ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थीना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थीचे नाव :
श्रीम. कुसुम दामोदर म्हात्रे,
रा. शहाबाज, पो. शहाबाज,
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.१४/०७/२०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**(मुकेश चव्हाण)**
**उपविभागीय अधिकारी अलिबाग**
**उपविभाग अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर १२२, एकूण क्षेत्र ०-९७-६० हे.आर., आकार २१.३१ रू.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१५-३० हे.., आकार ३.७० रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रणजीत प्रभाकर राणे रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/०७/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे मालक श्री. सिताराम गोविंद पाटील रा. कर्जत, ता. कर्जत, जि.रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं. / हि.नं. | एकुण क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३८/४ | ०-०९-०० | ०-१४ |
| ३८/५ | ०-०४-०० | ०-०६ |
| ३८/६/ब | ०-४५-४० | ०-५९ |

सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स मेहेर, वारसाहक्क , लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक: १०/०७/२०२६

सही /-
**ॲड.गीतांजली जी. फुलावरे.**
कार्यालय पत्ता: ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि.रायगड
क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.५७४/२०२५

१ श्रीम.सुगंधा अनंत ठाकूर
२ श्री.गणेश अनंत ठाकूर
३ श्री.राहूल अनंत ठाकूर — अपिलार्थी
४ श्रीम.तृप्ती अनंत ठाकूर
सर्व रा. लवसेन, बी आय टी चाळ नं.३,
खोली क्र.२६६, भायखळा पूर्व, मुंबई - १०

विरुद्ध

१ श्री.गजानन शंकर पाटील
रा.कुरकुंडी कोलटेंभी, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड — उत्तरार्थी
२ श्री.अनिल यादव पाटील
रा.सोनाफार्म, तिनिवरा, ता.अलिबाग, जि.रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १९७ क्षेत्र ०-२३-०० हे. आर. आकार ०.००, १९६/अ क्षेत्र ०-३१-५० हे. आर. आकार ०.०० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र.६३/२०२१, दि.०३/११/२०२५ मधील आदेशाविरुध्द या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. १३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैररहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०६/२०२६

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की आमचे अशिल श्री.नितीन दिलीप चव्हाण रा. मौजे-सांडशी, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची मौजे - सांडशी ता. कर्जत, जि.रायगड, येथील शेतजमीन तिचे मालक १) अशोककुमार सत्यनारायण सिंग २) हरेंद्र विदयाचल सिंग, यांचेकडून कायमचे विकत घेण्याचे ठरवलेले आहे .

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे- सांडशी ता. कर्जत, जि. रायगड, येथील शेतजमीन**
**मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये/पैसे |
|---|---|---|---|
| १९ | -- | ०.८०.०० | ०.७२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १०/७/२०२६

अधिवक्ता
**ॲड. निखिल हरिश्चंद्र नांदगावकर**
पत्ता- गाळा नं १ सरमुकादम बंगला
कर्जत दिवाणी न्यायालयाच्या समोर
ता. कर्जत जि.रायगड ४१०२०१
मो.नं. ८४४६३१७७८१

# दूरदृष्टी नेता खा. सुनील तटकरे

**श्री. सुभाष केकाणे**



कै. द. ग. तटकरे यांच्या नशिबी खा. सुनील तटकरेंच्या रूपाने हिरा जन्माला आला. खा. सुनील तटकरे यांना आपल्या राजकीय जीवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी केंद्रीय कृषी मंत्री शरदचंद्रजी पवार, माजी मुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांच्या तालमीत काम करण्याची संधी मिळाली. या नेते मंडळींचा सहवास तटकरे यांना नेहमीच त्यांच्या राजकीय जीवनात प्रेरणादायी असा लाभला. खा. सुनील तटकरे हे आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असून, भारतीय पेट्रोलियम व नॅचरल गॅस नियामक मंडळ भारत सरकार या पदांवर प्रभावीपणे काम करीत आहेत. आपला राजकीय अनुभव पणास लावून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटना अधिक बळकट करण्याच्या इराद्याने खा. तटकरे यांनी पावले उचललेली असून, त्यात त्यांना यश हि मिळत आहे. असे खा.सुनील तटकरे हे रायगड जिल्ह्याचे सुपुत्र म्हणून आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान वाटत आहे. त्यांना सुरवातीलाच आमच्या केकाणे कुटुंबियांतर्फे तसेच रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

कै. द.ग. तटकरे यांनी आपल्या या मुलाला उच्च शिक्षण देऊन त्यांच्यावर बालवयापासुनच चांगले संस्कार घडविले. तटकरे कुटुंबियांचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राचा आलेख पहिला तर या सर्वच क्षेत्रात त्यांनी गरुड भरारी घेतल्याचे दिसेल. रायगड जिल्हा परीषदेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी संपूर्ण रायगड जिल्हा ढवळून काढून समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचला पाहिजे, या उदान्त हेतूने त्यांनी आपले कार्य सुरु करत जनमानसात आपल्या कार्याचा एक आगळावेगळा ठसा उमटविला. त्यानंतर ते १४ माणगांव-रोहा विधानसभा मतदार संघातून सलग तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. सन २००९ मध्ये मतदार संघाची पुर्नरचना झाल्यावर १४ माणगांव-रोहा विधानसभा मतदार संघ बरखास्त होऊन १९३ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची निर्मिती झाली. त्यावेळी पहिल्याच या मतदार संघातील निवडणुकीकरिता सर्वच राजकीय नेत्यांवर व कार्यकर्त्यांवर खडतर आव्हान होते. यावेळी विरोधी पक्षाच्या लोकांनी खा.सुनील तटकरेंना टार्गेट केले होते. पण मुत्सद्दी, हुशार असे राजकारणी असणारे खा. सुनील तटकरे यांनी हे आव्हान स्वीकारून जिद्दीने हि निवडणूक लढवली आणि त्या निवडणुकीत ११ हजार मतांनी दणदणीत विजय संपादन करून निवडून आले. त्यामुळे श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचा प्रथम आमदार होण्याचा मान त्यांना मिळवता आला. त्यानंतर खा. सुनील तटकरेंनी विकासकामांचा बॅकलॉक श्रीवर्धन-म्हसळ्यात भरून काढून माणगांव, रोहा, तळा येथील जनतेला खुश केले. लोकशाही आघाडी सरकार असताना त्यांना नगरविकास राज्यमंत्री अन्न व नागरी पुरवठा मंत्री, उर्जामंत्री, जलसंपदा मंत्री, अर्थमंत्री अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणुन काम करण्याची संधी मिळाली. या सर्व खात्यात त्यांनी आपले विशेष प्रभाव पाहून प्रभावात्मक कामे केली. आज त्यांची कन्या आदिती तटकरे या श्रीवर्धन मतदार संघाच्या आमदार म्हणून विधान सभेवर निर्वाचित असून, त्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मंडळात महिला व बालविकास मंत्री म्हणून काम पाहत आहेत. खा.तटकरे यांचे सुपुत्र अनिकेत तटकरे हे नुकत्याच झालेल्या कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत महायुतीतून निवडून येऊन विधान परिषदेवर आमदार म्हणून निर्वाचित झाले आहेत.

महाविकास आघाडीचे सरकार असताना खा. तटकरे राज्याचे अर्थमंत्री झाल्यावर राज्याच्या अर्थसंकल्प सादर करतांना त्यांनी कोकणासाठी तब्बल ५ हजार कोटींचा निधी जाहीर केला. यावरून त्यांचे कोकणावरची असणारी प्रेम व निष्ठा स्पष्ट होते. उर्जामंत्री असतांना रायगड जिल्हा त्यांनी १०० टक्के भारनियमन मुक्त केला. राज्याचे जलसंपदा मंत्री व नगरविकास राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी प्रभावात्मक असे काम केले. रायगड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीत सन २०१४ मध्ये त्यांचा निसटता पराभव झाला. जीवनात यश-अपयश हे असतेच. आपण समाजासाठी काम करायचे. त्यांचे आशीर्वाद हेच आपली यशाची शिदोरी असते, असे तटकरे वारंवार सांगत असतात. लोकसभेतील निकाल स्पष्ट झाल्यावर त्याच दिवसापासून पुन्हा खा. तटकरेंनी आपली विकास कामाची घौडदौड पुढे सुरु केली. श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात माणगांव, रोहा, म्हसळा, श्रीवर्धन, तळा या पाच ही तालुक्यात त्यांनी मोठ्या प्रमाणात विकास कामे करून जनतेचे आशीर्वाद घेतले आहे. तळा तालुक्यात खा. तटकरे यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे करून विकासाची गंगा तालुक्यातील अत्यंत दुर्गम भागापर्यंत पोहचवून सर्वांना विकासकामे काय असतात, हे दाखवून दिले आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर सुनील तटकरे विधान परिषदेवर आमदार म्हणून बिनविरोध निवडून गेले. त्यानंतर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष या नात्याने त्यांनी सन २०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुका नजरेसमोर ठेऊन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या समवेत संपूर्ण महाराष्ट्रात फिरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोर्चेबांधणी केली. यावेळी तटकरेंनी सर्व जिल्ह्यात, सर्व लोकसभा व विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी पक्षाच्या कामाला सुरुवात केली. सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तटकरे हे ३२ रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघातून महाविकास आघाडीमधून मोठ्या फरकाने निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून न पाहता मतदार संघात विकास कामांची गंगा आणली. त्यांनी मतदार संघात विकास कामांबरोबरच जनसंपर्क सततचा ठेवला. मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मंडळी व कार्यकर्ते यांच्याशी संपर्क ठेऊन विकास कामांना गती देऊन विविध विकासाची कामे मार्गी लावली. सन २०२४ ला झालेल्या लोकसभा निवडणुकीत दुसऱ्यांदा ते निवडून येऊन लोकसभेवर खासदार म्हणून निर्वाचित झाले. त्यानंतर खा. तटकरे यांनी आपल्या रायगड जिल्ह्याकडे जास्तीतजास्त लक्ष केंद्रित करून मतदार संघाचा विकास करण्याचा प्रयत्न सुरु ठेवला आहे. जिल्ह्याचे पालक मंत्री असतांना संपूर्ण जिल्ह्यात त्यांनी विकास कामांचा धडाका लावला होता. रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनहर सुनील तटकरे यांनी चांगले काम करून अल्पवधीत या जिल्ह्यातही नावलौकिक मिळविला. या जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आजही खा. सुनील तटकरे यांचे नाव आदराने घेताना दिसतात. तटकरे कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपून सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. खा. तटकरे हे खरे विकास पुरुष असून, त्यांना ईश्वराने दीर्घायुष्य देवो हीच ईशवर चरणी मन:पूर्वक प्रार्थना!

**शब्दांकन- सलीम शेख, माणगाव.**










































## राशीभविष्य

- **मेष** : नवे करार मार्गी लागतील. कार्यातील सातत्य कामी येईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही तशीच राहील.
- **वृषभ** : गुंतवणुकीला चालना मिळेल. ज्येष्ठांच्या प्रकृतीस त्रास संभवतो. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **मिथुन** : कामाचा उत्साह वाढेल. महत्त्वाच्या भेटी लाभदायक ठरतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत तडजोडीचं धोरण ठेवावं. व्यवसाय साधारण राहील. नातलगांचं सहकार्य राहील.
- **सिंह** : प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. छोटा-मोठा प्रवास घडेल. वास्तुदोषांवर वेळीच उपाय करावेत.
- **कन्या** : रखडलेली कामं मार्गी लागतील. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. वाहन, यंत्रांचा वापर नीट करा.
- **तूळ** : कामाचं योग्य मोल होईल. आर्थिक अडचणींवर मात कराल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृश्चिक** : मनाजोग्या घटना घडतील. घरगुती प्रश्नांचा ताण राहील. शिक्षण क्षेत्रातील प्रयत्न कामी येतील.
- **धनु** : सरकारी कामं रखडतील. प्रेम प्रकरणात वाद-विवाद संभवतात. कसल्याही आमिषाला बळी पडू नये.
- **मकर** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. नव्या ओळखी कामी येतील. विवाहाचे बेत लांबणीवर पडतील.
- **कुंभ** : कार्यात अडचणी येतील. व्यवसायात नव्या समस्या उद्भवतील. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **मीन** : इतरांवर विसंबून राहू नका. कार्यविस्तार तुर्तास नको. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नव्या संधी लाभतील.

स्टाईल स्टेटमेंट

## हटके 'एव्हिल आय' ज्वेलरी

दागिन्यांवरचं एक डिझाइन म्हणून 'एव्हिल आय' खूपच लोकप्रिय ठरत आहे. या ट्रेंडविषयी...

* सध्या बाजारात 'एव्हिल आय' डिझाइनची छोट्या आकाराची पेंडंट मिळतात. ही पेंडंट खूप सुंदर दिसतात. ऑफिसमध्ये ही नाजूक पेंडंट कॅरी करता येतील.
* 'एव्हिल आय'ची लांब कानातलीही ट्रेंडमध्ये आहेत. ही कानातली तुमचा लूक नक्कीच खुलवतील. स्टेटमेंट इयररिंग म्हणूनही तुम्ही ती कॅरी करू शकता.
* बांगड्या किंवा मोठ्या आकाराची ब्रेसलेट्स सणसमारंभाला घातली जातात. दैनंदिन वापरासाठी नाजूक, कमी वजनाच्या ब्रेसलेट्सना पसंती मिळते. वेगळं ट्राय करायचं असेल तर 'एव्हिल आय' ब्रेसलेट घालता येईल.
* 'एव्हिल आय' डिझाइनची अँकलेट्सही इन आहेत. स्कर्ट, केप्री किंवा अगदी कुर्ता-लेगिंगवरही तुम्ही अशी अँकलेट्स घालू शकता.

## १० जुलै

दिन विशेष

**२०१३** : सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगार लोकप्रतिनिधींचं सदस्यत्व रद्द करण्याबाबतचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

**२०१४** : ज्येष्ठ अभिनेत्री जोहरा सेहगल यांचं निधन.

**२०१७** : अमरनाथ यात्रेकरुंवर दहशतवाद्यांचा हल्ला. सात यात्रेकरू ठार.

**२०१८** : एअरसेल-मॅक्सेस गैरव्यवहारप्रकरणी दिल्लीच्या न्यायालयाने माजी अर्थमंत्री पी.चिदंबरम आणि कार्ती चिदंबरम यांना अटक करण्यास ७ ऑगस्टपर्यंत मनाई केली.

सफर देशांची

## अनोखा पलाऊ

पॅसिफिक महासागराच्या पश्चिम भागात वसलेला पलाऊ हा देश म्हणजे बेटांचा समूह आहे. या देशाच्या सागरी सीमा इंडोनेशिया, फिलिपीन्स आणि फेडरेटेड स्टेट ऑफ मायक्रोनेशियाशी जोडलेल्या आहेत. हा देश भौगोलिकदृष्ट्या मायक्रोनेशिया या बेटांच्या मोठ्या समुहाचा भाग आहे. पलावन आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा आहेत. या देशात २५० पेक्षा जास्त बेटं आहेत. पलाऊ हा निसर्गसौंदर्याने नटलेला देश आहे. मुख्य म्हणजे इथल्या निसर्गाला अजूनही धोका पोहोचलेला नाही. या देशाला १५१९ किलोमीटरचा किनारा लाभला आहे. सागराचं निळंशार पाणी आणि मन मोहवून टाकणारे स्वच्छ, सुंदर समुद्रकिनारे हे पलाऊचं वैशिष्ट्य आहे. जगप्रसिद्ध 'रॉक आईसलँड'ही इथेच आहे. २०१२ मध्ये या बेटांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये करण्यात आला आहे. इथल्या 'इल मल्क' बेटांवर 'जेलीफिश लेक' हा सागरी तलाव आहे. 'इल मल्क' रॉक आईसलँडचा भाग आहे. या तलावात सोनेरी रंगाचे आकर्षक जेलीफिश बागडताना दिसतात. गंमत म्हणजे पर्यटकांना या जेलीफिशसोबत पोहायची संधी मिळते. या देशात सुंदर धबधबेही आहेत.

### पंचांग

**शुक्रवार, १० जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ कृ. १०/११, चंद्रराशी : मेष, नक्षत्र : भरणी, योग : धृति/शूल, सूर्योदय ६.१० सूर्यास्त ७.१८

### फॉरवर्ड्स

**ना ढूंढ़ हमारा क़िरदार दुनियाँ क़ी भीड़ में...**

**वफ़ादार तो हमेंशा तनहा मिलतें हैं...!**

आरोग्यमंत्र

## रातआंधळेपणा

डोळ्याच्या अंतभार्गात रेटीना किंवा दृष्टिपटल असते. त्यात काही वैशिष्ट्यपूर्ण पेशी असतात. या पेशींना 'कोन व रॉड' असे म्हणतात. त्यापैकी कोन हे उजेडातील दृष्टीसाठी तसेच वस्तूचा आकार, रंग याचे ज्ञान होण्यासाठी आवश्यक असतात. रॉड हे अंधारातील दृष्टीसाठी



आवश्यक असतात. रॉडमध्ये होडोप्सीन नावाचे रंगद्रव्य असते. याची निर्मिती जीवनसत्त्व 'अ' पासून होत असते. उजेडात होडोप्सीनचे रूपांतर जीवनसत्त्व 'अ' मध्ये, तर अंधारात जीवनसत्त्व 'अ' चे रूपांतर होडोप्सीनमध्ये होते. अंधारात दिसण्यासाठी होडोप्सीन निर्माण होणे महत्त्वाचे आहे. जीवनसत्त्व 'अ'च्या अभावामुळे होडोस्पीनची निर्मिती कमी प्रमाणात होते व साहजिकच अंधारातील दृष्टीवर विपरीत परिणाम होतो. जीवनसत्त्व 'अ'चा अभाव विशेषेकरून सहा वर्षांपर्यंतच्या मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. अशी मुले सायंकाळी चाचपडत चालतात. आवाजाचा कानोसा घेऊन चालायचा प्रयत्न करतात व वस्तूंना अडखळून पडतात. यालाच 'रातांधळेपणा' असे म्हणतात. रातांधळेपणा येणे ही जीवनसत्त्व 'अ'च्या अभावामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची फक्त सुरुवात असते. जीवनसत्त्व 'अ'चा पुरवठा न झाल्यास डोळ्यातील आवरण कोरडे पडून त्यावर व्रण पडतो. शेवटी डोळ्यात फूल वा टीक पडू शकते. अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आजारात डोळा पूर्णपणे खराब होऊन अंधत्व येते.

### भटकंती

दोस्तांनो, मान्सून पिकनिकची मजा काही वेगळीच असते. या दिवसात जिकडेतिकडे धबधबे कोसळत असतात. असंच एक ठिकाण म्हणजे ठोसेघर धबधबा. साताऱ्यातला हा धबधबा मान्सून वीकेंड पिकनिकसाठी बेस्ट ठिकाण आहे. पश्चिम घाटाच्या कुशीत वसलेला हा धबधबा आपलं मन मोहवून टाकतो. निसर्गरम्य असं हे ठिकाण आपल्याला आकर्षित करतं. इथे निवांत क्षण घालवता येतात. साताऱ्याच्या जवळपास अनेक धबधबे आहेत. त्यापैकी एक म्हणजे ठोसेघर धबधबा. सज्जनगड आणि पवनचक्क्यांचं मनोहारी दृश्य बघत आपण ठोसेघरला पोहोचतो. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## समोरच्याशी बोलताना...

जगाने आपल्यावर विश्वास ठेवावा असं वाटत असल्यास आधी आपला स्वत:वर दृढविश्वास असायला हवा. तो व्यक्त करण्याचे योग्य मार्ग अवलंबायला हवे. उदाहरणार्थ तुम्ही कशाप्रकारे हस्तांदोलन करता यावरुनही तो व्यक्त होत असतो. तुम्ही केलेल्या हस्तांदोलनातून



समोरच्या व्यक्तीला एक प्रकारचा विश्वास मिळणं गरजेचं असतं. त्यादृष्टीने योग्य पध्दतीनं हस्तांदोलन कसं करावं, हे जाणून घ्यायला हवं. हस्तांदोलन करताना तुमचा हात एकदम सैल नसावा किंवा तुम्ही समोरच्या व्यक्तीचा हात फार जोरात दाबता कामा नये. या दोन्ही बाबी तुमच्याविषयी समोरच्या व्यक्तिच्या मनात प्रतिकूल भावना निर्माण करणाऱ्या ठरु शकतात. ताठ उभं राहणं किंवा खुर्चीत ताठ बसणं याही बाबी महत्त्वाच्या आहेत. कारण यातूनही आत्मविश्वास प्रतित होत असतो. समोरच्या माणसाशी बोलताना अकारण हात-पाय हलवू नये. यातून तुमच्यावर काही ताण आहे, असा अर्थ निघतो. समोरच्या व्यक्तिशी संवाद साधताना भरभर बोलू नये. तुम्ही काय बोलत आहात नीट कळायला हवं. अर्थात अगदी सावकाशही बोलू नये. कारण या दोन्ही गोष्टीतून तुमच्यात आत्मविश्वास कमी असल्याचं प्रतित होतं.

खेचाखेची

### बुद्धिबळ

संता एके दिवशी सुट्टी बघून आपल्या कुत्र्यासोबत बुद्धिबळ खेळायला घराच्या अंगणात बसला.

त्याच्या मित्राने समोरुन जाताना संता कुत्र्यासोबत बुद्धिबळ खेळत असल्याचे बघितले आणि तो त्यांचा डाव बघायला तेथे थांबला.

**मित्र** : सांता, माझ्या पहाण्यातला हा सर्वात हुशार कुत्रा आहे.

**संता** : नाही रे, पाच डावांमधले तो फक्त दोनच डाव जिंकलाय.

### वेगळं काही

गेल्या महिन्यात युरोप खंडातल्या अनेक देशांमध्ये तीव्र उन्हाळा होता. तापमानाने ४५ अंशांचा टप्पा गाठला होता. या वाढत्या उकाड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांनी अनेक युक्त्या शोधून काढल्या. फ्रान्समधल्या बेथ्यून शहरात जुन्या बसमध्येच जलतरण तलाव तयार करण्यात आले. या बस शहरातल्या विविध ठिकाणी ठेवण्यात आल्या. या स्वीमिंग पूलमध्ये लोक मनसोक्त डुंबून घेत होते. यंदा फ्रान्समध्ये प्रचंड उकाडा होता. ही तीव्रता कमी करण्यासाठी प्रशासनाने ही अनोखी संकल्पना लढवली. शहरातल्या स्वीमिंग पूल नसलेल्या ठिकाणी हे फिरते स्वीमिंग पूल तैनात करण्यात आले.

गेट रेडी

## पार्टीमध्ये उठून दिसायचंय?

समारंभासाठी तयार होताना हातात वेळ कमी असेल तर काही फंडे अजमावता येतात. उदाहरणार्थ नेलपेंट लवकर सुकवायचं असेल तर भांड्यात बर्फ घालून त्यात हात बुडवून ठेवावे. त्यामुळे न फिसकटता नेलपेंट लवकर सेट होतं. फाउंडेशन लावताना ड्रेसच्या नेक लाईनवर डाग पडतात. यावर उपाय म्हणून या ठिकाणी थोडसं शेव्हिंग क्रीम चोळावं. डाग लगेच निघून जातात. सध्या निसर्गाशी साधर्म्य साधणाऱ्या ज्वेलरीचा ट्रेंड आहे. त्यामुळे तयार होताना तुम्हीही अशा ज्वेलरीचा पर्याय समोर ठेवू शकता. इअररिंगमध्ये लीफ ड्रॉप एअररिंग्ज ट्रेंडमध्ये आहे. एलिगंट लूक देणाऱ्या कफ बॅंगल्सही तुम्ही घालू



शकता. याला मॅच करणारी लीफ रिंग कोणत्याही आउटफिटवर खुलून दिसते. त्यामुळे तुम्ही अशा अंगठीची निवड करु शकता. प्रत्येक समारंभासाठी नवे कपडे घेण्यापेक्षा वापरात नसणाऱ्या साड्यांचे ड्रेस शिवून त्यावर हेवी वर्क असणारे दुपट्टे घेतले तर तुम्हाला वेगळाच लूक मिळून जातो. कोणत्याही टॉप किंवा चोलीवर हेवी लेहंगा घालण्यापेक्षा तो शर्टसोबत मॅच केल्यास वेगळा लूक मिळतोच शिवाय तुम्ही पार्टीमध्ये उठून दिसता.

## सुडोकू १२५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | ८ | | | | ९ | |
| ४ | ७ | | | ५ | २ | | | |
| २ | | | | १ | | ५ | ६ | |
| ७ | | | | | ६ | ८ | ४ | |
| | | | | ९ | | | | |
| | ८ | ६ | १ | | | | | २ |
| | ६ | ३ | | ८ | | | | ५ |
| | | | ९ | २ | | | ३ | ६ |
| | २ | | | | ४ | ७ | | |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | १ | ७ | ६ | ९ | ८ | २ | ४ | ३ |
| २ | ४ | ६ | ५ | १ | ३ | ९ | ८ | ७ |
| ८ | ३ | ९ | ४ | ७ | २ | १ | ६ | ५ |
| ४ | ७ | २ | ९ | ६ | ५ | ३ | १ | ८ |
| ९ | ६ | १ | ८ | ३ | ७ | ५ | २ | ४ |
| ४ | ५ | ८ | २ | ४ | १ | ७ | ९ | ६ |
| ६ | ९ | ५ | ३ | २ | ४ | ८ | ७ | १ |
| १ | २ | ३ | ७ | ८ | ६ | ४ | ५ | ९ |
| ७ | ८ | ४ | १ | ५ | ९ | ६ | ३ | २ |

## शब्दकोडे क्रमांक १२५



**आडवे शब्द :-**
१) बळजबरी
४) कशाला?
१०) नंतर
११) आवाजांचा गोंधळ
१२) रुपेरी पडदा
१४) धमनी
१६) कोलकाताचे विमानतळ
१८) झगडा
१९) मान, प्रतिष्ठा
२०) लोकनाट्य
२२) नशीब (इं )
२३) विहीर
२४) खिळे ठोकण्याचे हत्यार
२५) आरडाओरड, दंगा, गडबड
३७) हात
२८) चंद्राची कड
२९) शर्त
३०) अवधान, चित्त
३१) हिंमत, धैर्य
३३) कर्ज देणारा
३४) पाप धुणे
३५) नवरदेवाची आई
३८) सगळीकडे
३९) राजा
४०) गोव्याची राजधानी
४२) अनुमती, मान्यता
४४) अजगर
४५) संगीतातील एक राग
४७) मीठ
४९) मध्यस्थ
५०) हवाईअड्डा
५१) पत्रिकेतील अधुभ ग्रह
५५) वर्ष, साल
५६) श्रीरामाची आई
५७) लायब्ररी (म )
५९) नौदल
६१) दुप्पट
६२) वजनाला कमी
६४) चक्कर घेरी
६५) स्तुतीस्तोत्र
६७) घरोघर
६९) युद्ध
७०) टोळीचा प्रमुख
७१) चाळीस शेर

**उभे शब्द :-**
१) जामीनकी
२) दारुचा एक प्रकार
३) पत्थर
४) लेखणी
५) भाजी
६) भांडखोर
७) तारणारा
८) बेडी
९) किरकोळ सामान
११) नरमच्या विरुद्ध
१३) पाऊल, गाणे
१५) संतोष, आनंद
१७) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषधी प्रकार
२१) संध्याकाळ, श्रीकृष्ण
२३) दर्पण
२६) तंबाखूचे पान
२७) गीत, गाणे
२९) विनाकारण
३०) नशीब
३१) फार मोठा लाभ
३२) आश्चर्य
३३) मलई
३४) उमा, महादेवाची पत्नी
३६) चापट
३७) कवडीमोल,
३८) सारखे, तुल्यबळ
३९) किंमत
४१) आयुष्य
४३) पंकज
४४) निकट, आजूबाजूस
४६) रुग्णालय
४७) रात्रभर
४८) टोक
५०) विसराळू
५२) च्या पलीकडे (ग्रा )
५३) नगरपाल
५४) पैंजण
५६) पांडवांचे चुलत भाऊ
५८) लाट हुक्की
५९) सुस्ती
६०) शिक्षक
६३) निमित्त
६६) धमनी
६८) गुलामी

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ‘लॉर्ड्स’वर पहिल्यांदाच ‘वुमन्स’ कसोटी

## इंग्लंडसमोर अजिंक्य भारताचे आव्हान; दोन्ही संघ ठरणार ऐतिहासिक साक्षीदार

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

क्रिकेटचे घर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर शुक्रवारपासून एक नवा इतिहास रचला जाणार आहे. १४२ वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर येथे पहिल्यांदाच महिला कसोटी सामना खेळवला जाईल.या ऐतिहासिक सामन्यात भारताचा सामना इंग्लंडशी होईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आणि नॅट स्कीवर-ब्रंटच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघ हा क्षण अविस्मरणीय बनवण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहेत. क्रिकेट चाहत्यांसाठी हा सामना कोणत्याही रोमांचपेक्षा कमी नसेल.



पुरुषांच्या पहिल्या कसोटी सामन्यानंतर १४२ वर्षांनी येथे महिला कसोटी सामना होत आहे. १९३७ पासून आतापर्यंत इंग्लंडच्या महिला संघाने १९ वेगवेगळ्या मैदानांवर ५५ कसोटी सामने खेळले आहेत, परंतु लॉर्ड्स मैदान मात्र अद्याप अस्पर्शित राहिले होते. जून २०२३ मध्ये क्रिकेटमधील समानता आयोगाच्या एका अहवालात लॉर्ड्सवर महिला कसोटी सामना न होणे हे लाजिरवाणे असल्याचे म्हटले होते. अहवालात म्हटले होते की क्रिकेटचे घर (लॉर्ड्स) अजूनही पुरुषांचेच घर आहे. यानंतरच बोर्ड जागे झाले आणि ऐतिहासिक सामना निश्चित झाला.

पुरुषांच्या तुलनेत महिला कसोटीच्या नियमांमध्ये सर्वात मोठा फरक दिवसांच्या संख्येचा आहे. पुरुष कसोटी पाच दिवसांची असते. महिला कसोटी चार दिवसांपर्यंतच खेळली जाते. तथापि, इतिहासात पाच दिवसांच्या दोन महिला कसोटीही झाल्या आहेत. महिला कसोटीत एका दिवसात किमान १०० षटके टाकण्याचा नियम आहे, तर पुरुषांमध्ये हे ९० षटकांचे असते. महिला कसोटीत फॉलोऑन २०० धावांच्या ऐवजी १५० धावांच्या आघाडीवर दिला जाऊ शकतो.कसोटीत भारताचे पारडे जड आहे. भारताने १९९५ नंतर इंग्लंडकडून कोणतीही कसोटी गमावलेली नाही. इंग्लंडच्या भूमीवर तर भारत आतापर्यंत अजिंक्य आहे. ९ कसोटींपैकी २ जिंकल्या आहेत आणि ७ अनिर्णित राहिल्या आहेत. दोघांमधील शेवटची कसोटी डिसेंबर २०२३ मध्ये नवी मुंबईत झाली होती, जी भारताने ३४७ धावांनी जिंकली होती. इंग्लिश भूमीवर दोन्ही संघ शेवटचे २०१४ साली भिडले होते.

अलीकडेच टी-२० विश्वचषकात भारत गट टप्प्यातून बाहेर पडला होता, तर इंग्लंडला अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला होता. कसोटीबद्दल बोलायचे झाल्यास, भारताने मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पर्थमध्ये कसोटी सामना खेळला होता, ज्यात त्यांना पराभव पत्करावा लागला होता. २००६ नंतर भारताचा हा पहिला कसोटी पराभव होता. दुसरीकडे, इंग्लंडने आपला शेवटचा कसोटी सामना जानेवारी २०२५ मध्ये खेळला होता. इंग्लिश संघाने २०१५ पासून खेळलेल्या मागील १० कसोटी सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे. दोन्ही संघांमध्ये ८ अशा खेळाडू आहेत, ज्या पहिल्यांदाच कसोटी संघात सामील झाल्या आहेत. भारताच्या हरलीन देओल, श्री चरणी आणि वेगवान गोलंदाज नंदनी शर्मा अनकॅप्ड आहेत. तर, इंग्लंडच्या एलिस कॅप्सी आणि १८ वर्षीय टिली कॉर्टन-कोलमॅन यांसारख्या युवा खेळाडूंचा समावेश आहे. चाहत्यांचे विशेष लक्ष इंग्लंडची वेगवान गोलंदाज लॉरेन फाइलर आणि भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना यांच्यावर असेल. टॉप ऑर्डरमध्ये स्थान मिळवण्यासाठी तीव्र स्पर्धा पाहायला मिळेल.

## टीम इंडियाला मोठा झटका; स्टार खेळाडू संघाबाहेर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि इंग्लंडच्या महिला संघांमध्ये १० ते १३ जुलैदरम्यान हा ऐतिहासिक सामना रंगणार आहे. मात्र या सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. एक स्टार खेळाडू या सामन्यातून बाहेर पडली आहे.

भारतीय महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती दिली आहे. संघातील स्टार फलंदाज प्रतिका रावल दुखापतीमुळे या ऐतिहासिक कसोटी सामन्यातून बाहेर पडली आहे. लॉर्ड्सवर खेळण्याचं तिचं



स्वप्न भंगले आहे, हा भारतीय संघासाठीही मोठा धक्का मानला जात आहे. तिच्या जागी अनुभवी फलंदाज प्रिया पुनिया हिची संघात निवड करण्यात आली आहे.

भारत आणि इंग्लंडच्या महिला संघांमधील कसोटी क्रिकेटमध्ये भारताचं पारडं जड आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत १४ कसोटी सामने खेळले गेले असून भारताने ३ सामने जिंकले आहेत, तर इंग्लंडने केवळ एका सामन्यात विजय मिळवलेला आहे. उर्वरित १० सामने अनिर्णित राहिले आहेत. दोन्ही संघांमधील अखेरचा कसोटी सामना २०२३ मध्ये झाला होता. त्यावेळी इंग्लंडचा तब्बल ३४७ धावांनी पराभव केला होता.

भारतीय संघात हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज, प्रिया पुनिया, दीप्ती शर्मा, ऋचा घोष (यष्टिरक्षक), श्री चरणी, यास्तिका भाटिया (यष्टिरक्षक), नंदिनी शर्मा, हरलीन देओल, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, सायली सातघरे आणि स्नेह राणा यांचा समावेश असणार आहे.

## गोव्यात रंगणार टेबल टेनिसचा महासंग्राम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बटरफ्लाय अल्टिमेट टेबल टेनिस सीझन ७ ची सुरुवात गुरुवार, ९ जुलै रोजी होणार आहे. या हंगामाची सुरुवात एका जबरदस्त वेस्टर्न डर्बीने डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियमवर होणार आहे. यजमान आणि दोन वेळा विजेतेपद पटकावणारा डेम्पो गोवा चॅलेंजर्स संघाचा सामना गतविजेत्या यू मुंबा टीटी संघाशी होणार आहे. पुढील १८ दिवस सात संघ या प्रतिष्ठित विजेतेपदासाठी झुंज देतील आणि अंतिम सामना २६ जुलै रोजी खेळवला जाईल.

बटरफ्लाय यूटीटी या हंगामात एआय-आधारित टेबल टेनिस रिव्ह्यू प्रणाली देखील सादर करणार आहे. व्हिडिओ रिव्ह्यू तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या जगातील मोजक्या लीगपैकी ही एक लीग ठरेल.

लीगचे अधिकृत तंत्रज्ञान भागीदार असलेल्या गुरुग्राममधील स्तुपा स्पोर्टसने विकसित केलेली ही प्रणाली, वादग्रस्त निर्णयांची पडताळणी २० सेकंदांपेक्षा कमी वेळेत पूर्ण करेल. प्रत्येक सामन्यात प्रत्येक संघाला तीन टीटीआर रिव्ह्यूज मिळतील, त्यामुळे भारतीय प्रेक्षकांसाठी हा एक नवीन अनुभव असेल. बटरफ्लाय यूटीटीच्या सातव्या हंगामात सात संघ सिंगल राउंड-रॉबिन फॉरमॅटमध्ये एकमेकांशी स्पर्धा करतील.

## फिफा वर्ल्डकपच्या तिकिटांची किंमत झाली कमी!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२६ चा फुटबॉल विश्वचषक आता महत्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. उपांत्यपूर्व फेरीचे सामने या आठवड्यात सुरू होणार आहेत, पण त्याआधी फुटबॉल चाहत्यांसाठी एक मोठी बातमी आहे. स्पर्धेतील सर्वात मोठ्या बाद फेरीच्या सामन्यांपैकी एका सामन्याची तिकिटे आता पूर्वीपेक्षा खूपच स्वस्त झाली आहेत.

टिकपिक या दुय्यम तिकीट विक्री प्लॅटफॉर्मनुसार, स्पेन आणि बेल्जियम यांच्यातील शुक्रवारच्या उपांत्यपूर्व सामन्याच्या सर्वात स्वस्त तिकिटाच्या दरात मोठी घट झाली आहे. पूर्वी तिकिटांची किंमत सुमारे २,९५० डॉलर होती, पण आता सुरुवातीची किंमत सुमारे १,२०० डॉलरपर्यंत खाली आली आहे. ही तिकिटांच्या दरात जवळपास ६० टक्के कपात आहे.या कारणामुळे तिकिटांच्या किंमती कमी झाल्या या घसरणीचे सर्वात मोठे कारण अमेरिकेचे स्पर्धेतून बाहेर पडणे हे मानले जाते. अमेरिका फिफा विश्वचषक २०२६ चा सह-यजमान देश आहे. उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमने अमेरिकेला पराभूत करून स्पर्धेतून बाहेर काढले. अमेरिका उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली असती, तर देशांतर्गत चाहत्यांच्या प्रचंड मागणीमुळे तिकिटांच्या किमती आणखी वाढल्या असत्या. उपांत्यपूर्व फेरीत अमेरिका आणि पोर्तुगाल आमनेसामने आले, तर तो स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेचा सामना ठरू शकतो.

### रोनाल्डोचा प्रभाव

तिकिटांच्या दरात घट होण्याचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे पोर्तुगालचे स्पर्धेतून बाहेर पडणे आहे. स्पेनने पोर्तुगालला १-० ने हरवून स्पर्धेतून बाहेर काढले. या पराभवाने फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोच्या फिफा विश्वचषक कारकिर्दीचा शेवट झाला. रोनाल्डो जगातील सर्वात लोकप्रिय खेळाडूंपैकी एक मानला जातो, त्यामुळे त्याच्या स्पर्धेतून बाहेर पडण्याचा तिकिटांच्या मागणीवर मोठा परिणाम झाला. हा शेवटचा विश्वचषक असल्याचे रोनाल्डोनेही सांगितले आहे.

# निवडक

## गांगुलीच्या बायोपिक पोस्टरची तुफान चर्चा

**नवी दिल्ली :** भारताचा कधीकाळचे स्टार क्रिकेटर आणि भारतीय क्रिकेट संघाचे नेतृत्त्व मोठ्या हिमतीने करणारे दादा म्हणजेच सौरव गांगुली यांच्या जीवनावर आधारित एक चित्रपट येत आहे. या चित्रपटात सौरव गांगुली यांची जीवनगाथा सांगण्यात येणार आहे. सौरव गांगुली यांच्या जन्मदिनानिमित्त या चित्रपटाचे



पहिले पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. दरम्यान, हे पोस्टर समोर येताच लोकांनी मात्र मोठी नाराजी व्यक्त केली आहे. हे पोस्टर आवडले नसल्याचे मत अने कनेटकऱ्यांनी व्यक्त केले आहे.सौरव गांगुली यांची भूमिका राजकुमार राव करत आहे. राजकुमार रावनेच या चित्रपटाचे पोस्टर आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर टाकले असून त्याने सौरव गांगुली यांनादेखी टॅग केले आहे. सौरव गांगुली यांच्या नेतृत्त्वात २००२ साली भारताने नेटवेस्ट ट्रॉफी जिंकली होती. विजय मिळाल्यानंत गांगुली यांनी अंगावरील शर्ट काढून खास सेलिब्रेशन केले होते. गांगुली यांचे हेच सेलिब्रेशन नंतर चांगलेच गाजले होते. सध्या जारी करण्यात आलेल्या पोस्टरमध्ये हेच दृश्य पुन्हा एकदा उभारण्यात आले आहे. परंतु नेटकऱ्यांना हे पोस्टर आवडलेले नाही. एका नेटकऱ्याने पोस्टरचे एडिटिंग खूपच खराब आहे, त्यापेक्षा एआयच्या मदतीने चांगले पोस्टर तयार करत आले असते, अशी प्रतिक्रिया दिली आहे. तर एका नेटकऱ्याने प्लीज हे पोस्टर डिलीट करा म्हणत नाराजी व्यक्त केली आहे. एका नेटकऱ्याने मजाक लावली आहे का? असे विचारून नापसंती व्यक्त केली.

## एमबाप्पेला मेस्सीच्या पुढे जाण्याची संधी

**बोस्टन :** फिफा विश्वचषक २०२६ मध्ये आज रात्री पहिला उपांत्यपूर्व सामना खेळला जाईल. किलियन एमबाप्पेच्या फ्रान्सचा सामना जायंट किलर्स मोरोक्कोशी होईल. सामना बोस्टन स्टेडियममध्ये रात्री १:३० वाजता सुरू होईल. फ्रान्सचा स्ट्रायकर एमबाप्पेने या स्पर्धेत ७ गोल केले आहेत. मेस्सी ८ गोलसह गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर आहे. जर



एमबाप्पेने या सामन्यात गोल केला, तर तो मेस्सीला मागे टाकेल. फ्रान्स आणि मोरोक्को यांच्यात ६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. यामध्ये फ्रान्सचे एकतर्फी वर्चस्व राहिले आहे. फ्रान्सने ४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. मोरोक्कोला फक्त १ मध्ये विजय मिळाला आहे. १ सामना अनिर्णित राहिला आहे.फिफा विश्वचषकाच्या इतिहासात दोन्ही संघ दुसऱ्यांदा आमनेसामने येतील. यापूर्वी २०२२ च्या विश्वचषक उपांत्य फेरीत फ्रान्सने मोरोक्कोचा २-० ने पराभव केला होता. मोरोक्को या पराभवाचा बदला घेऊ इच्छितो. फ्रान्सचा संघ या स्पर्धेत अजिंक्य राहिला आहे. संघाने आपले सर्व ५ सामने जिंकले आहेत. ग्रुप स्टेजमध्ये फ्रान्सने नॉर्वेला ४-१, इराकला ३-० आणि सेनेगलला ३-१ ने हरवले.राउंड ऑफ ३२ मध्ये संघाचा सामना स्वीडनशी झाला. यात संघाने ३-० ने विजय मिळवला. नंतर राउंड ऑफ १६ मध्ये पॅराग्वेला १-० ने हरवून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली. फ्रान्सचा संघ एमबाप्पेकडून आक्रमक फिनिशिंगची अपेक्षा करेल. त्याच्यावर मोरोक्कोचा बचाव भेदण्याची जबाबदारी असेल.

## भारतासमोर मालिका वाचवण्याचे आव्हान

**ब्रिस्टल :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील चौथा सामना गुरुवारी ब्रिस्टल येथील काउंटी ग्राउंडवर खेळला जाईल. सामना भारतीय वेळेनुसार रात्री १० वाजता सुरू होईल. इंग्लंड मालिकेत २-० ने आघाडीवर आहे. पहिला सामना पावसामुळे अनिर्णित राहिला होता, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या टी-२० मध्ये यजमान संघाने विजय मिळवला होता.भारतासाठी हा सामना मकरो या मरोफ्चा आहे. पराभव झाल्यास संघ मालिका गमावेल. २०१८-१९ नंतर ही पहिलीच वेळ असेल, जेव्हा भारत सलग दोन टी-२० मालिका हरू शकतो. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. त्याने आपल्या सुरुवातीच्या दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १४ आणि १३ धावा केल्या आहेत. म्हणजेच आतापर्यंत २ सामन्यांत तो केवळ २७ धावाच करू शकला आहे.टी-२० कर्णधार बनल्यानंतर श्रेयस अय्यरला अद्याप एकही आंतरराष्ट्रीय सामना जिंकता आलेला नाही. इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात १२५ धावांनी पराभव झाल्यानंतर त्याने संघाच्या कामगिरीला अत्यंत खराब म्हटले होते. आयपीएलसह श्रेयसने त्याच्या मागील ११ टी-२० कर्णधारपदाच्या सामन्यांपैकी १० सामने गमावले आहेत.प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी मात्र सांगितले की, एका पराभवाने संघ खराब होत नाही. त्यांच्या मते, भारत आपला आक्रमक दृष्टिकोन बदलणार नाही.हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखाली इंग्लंड उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. संघाने मागील २१ टी-२० सामन्यांपैकी १८ जिंकले आहेत. इंग्लंडकडे इतिहास रचण्याची संधी आहे, कारण त्यांनी आतापर्यंत भारतासमोर दोन किंवा त्याहून अधिक सामन्यांची टी-२० मालिका कधीही जिंकलेली नाही.






















कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)